CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३२१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# योग्य इतिहास शिकवला असता तर औरंगजेब एकाही मुसलमानाचा हिरो नसता! : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ७५ हजार हिंदूंची कत्तल करणाऱ्या टिपूची शिवरायांशी बरोबरी खपवून घेणार नाही

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. २६ फेब्रुवारी :** देशाचा खरा इतिहास ७० वर्षे जाणीवपूर्वक लपवून ठेवण्यात आला. जर योग्य वेळी नीट आणि वस्तुनिष्ठ इतिहास शिकवला गेला असता, तर आज या देशातील एकाही मुसलमानाने क्रूरकर्मा औरंगजेबाला आपला 'हिरो' मानले नसते, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (२६ फेब्रुवारी) विधानसभेत विरोधकांवर प्रहार केला. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी इतिहासाच्या विकृतीकरणाचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेस आणि डाव्या विचारसरणीवर निशाणा साधला.

आमदार विजय वडेट्टीवार आणि भास्कर जाधव यांनी उपस्थित केलेल्या टिपू सुलतानच्या मुद्द्याला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, टिपू सुलतान चांगले होते की, वाईट यावर आमचा आक्षेप नाही. पण ज्यावेळी टिपू सुलतान हे छत्रपती शिवरायांऐवढे मोठे राजे होते, असे कुणीतरी म्हणतो, त्याला आमचा आक्षेप आहे. दुर्दैवाने, या देशाच्या इतिहासाशी जी छेडछाड करण्यात आली, त्यात वर्षानुवर्षे आम्हाला टिपू सुलतान हे महान राजे होते हेच शिकवण्यात आले. पण ७५ हजार हिंदूंची आणि ३३ हजार नायरांची कत्तल करणारेही टिपू सुलतानच होते, हे आम्हाला कधीच शिकवले नाही. आता खरा इतिहास सापडतो आहे.

या देशात सरकारने ७० वर्षे एनसीईआरटीच्या पुस्तकात मुघल साम्राज्याला १७ पाने दिली आणि छत्रपती शिवरायांना एक परिच्छेद दिला. आता



मोदी सरकारने एनसीईआरटीमध्ये छत्रपती शिवरायांच्या मराठ्यांच्या इतिहासाला २० पाने दिली. योग्यवेळी नीट इतिहास शिकवला असता तर या देशातील एकाही मुसलमानाने औरंगजेबाला आपला हिरो म्हटले नसते. पण आपण खरा इतिहास कधी शिकवलाच नाही. या देशात अनेक राष्ट्रभक्त मुस्लीम आहेत आणि त्यांच्याबद्दल आमचा कुठलाच आक्षेप नाही. जे लोक देशाच्या विरोधातील लोकांना आपला हिरो म्हणतील त्यांच्याविरुद्ध आम्ही लढाई करू, असा इशाराही त्यांनी दिला.

## इस्रायलमध्ये भारतीय UPI लागू होणार, मोदी-नेतन्याहू बैठकीत करार

**तेल अवीव/वृत्तसंस्था :** पंतप्रधान मोदींच्या इस्रायल दौऱ्याचा आज दुसरा दिवस आहे. भारताची णझख पेमेंट सिस्टीम आता इस्रायलमध्ये लागू केली जाईल, असा निर्णय मोदी आणि इस्रायली पंतप्रधान नेतन्याहू यांच्यात झालेल्या द्विपक्षीय बैठकीत घेण्यात आला.




पंतप्रधान नेतन्याहू यांच्यासोबत संयुक्त पत्रकार परिषदेत मोदींनी सांगितले की, भारत लवकरच इस्रायलसोबत मुक्त व्यापार करार करणार आहे. इस्रायलला भेट देणे ही त्यांच्यासाठी अभिमानाची गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

आज सकाळी, पंतप्रधान मोदींनी प्रथम जेरुसलेममधील होलोकॉस्ट स्मारक याद वाशेमला भेट दिली, जिथे त्यांनी हिटलरच्या नाझी राजवटीत मारल्या गेलेल्या साठ लाख ज्यूंना श्रद्धांजली वाहिली.

त्यानंतर मोदींनी इस्रायली राष्ट्राध्यक्ष आयझॅक हर्झोग यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय बैठक घेतली. आयझॅक यांनी सांगितले की भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढली आहे आणि जगाचे लक्ष वेधून घेत आहे. पंतप्रधान मोदींनी इस्रायली राष्ट्राध्यक्षांना भारत भेटीचे आमंत्रणही दिले.

## खाण अधिकाऱ्याच्या घरातून तब्बल ४ कोटींची रोकड जप्त

**भुवनेश्वर/वृत्तसंस्था :** भ्रष्टाचाराविरोधातील कारवायांमध्ये ओडिशा राज्यात मोठी धडक कारवाई समोर आली आहे. ओडिशा दक्षता विभागाने कटक सर्कलमधील खाणींचे उपसंचालक देवव्रत मोहंती यांना लाच स्वीकारताना रंगेहात पकडले असून त्यांच्या ताब्यातून तब्बल चार कोटी रुपयांहून अधिक रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. राज्याच्या इतिहासातील दक्षता विभागाने केलेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी रोख जप्ती असल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कटक सर्कलमध्ये कार्यरत असलेले खाणींचे उपसंचालक देवव्रत मोहंती यांनी एका परवानाधारक कोळसा व्यापाऱ्याकडून त्याचा कोळसा डेपो सुरळीत चालवण्यासाठी आणि कोळशाच्या वाहतुकीला परवानगी देण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. या तक्रारीनंतर ओडिशा दक्षता विभागाने सापळा रचत मंगळवारी (२४ फेब्रुवारी) कारवाई केली आणि मोहंती यांना ३० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. त्यांच्या ताब्यातून लाचेची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात आली असून तत्काळ त्यांना अटक करण्यात आली.

अटकेनंतर दक्षता विभागाने एकाच वेळी तीन ठिकाणी धाडी टाकल्या. भुवनेश्र्वर येथील त्यांच्या निवासस्थानी, भद्रक जिल्ह्यातील मथासाही येथील वडिलोपार्जित घरी तसेच कटक येथील कार्यालयातील दालनात झडती घेण्यात आली. भुवनेश्र्वरमधील पाटिया परिसरातील श्रीविहार नेचर क्रेस्ट अपार्टमेंटमधील त्यांच्या फ्लॅटमध्ये मोठ्या प्रमाणात रोख रक्कम सापडली. ही रक्कम ट्रॉली बॅग आणि कपाटांमध्ये लपवून ठेवण्यात आली होती. प्राथमिक माहितीनुसार, जप्त केलेली रक्कम चार कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे.

सध्या जप्त केलेल्या रोकड रकमेची मोजणी सुरू असून अंतिम आकडा मोजणी पूर्ण झाल्यानंतर जाहीर केला जाणार आहे. अधिकाऱ्यांच्या मते, राज्यातील सतर्कता विभागाच्या कारवाईत इतक्या मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम जप्त होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

या धाडीतून मोहंती यांच्या इतर संपत्तीबाबतही माहिती समोर आली आहे. भुवनेश्र्वरमधील पहाला परिसरात त्यांचे दुमजली घर असल्याचे उघड झाले आहे. याशिवाय सुमारे १३० ग्रॅम सोन्याचे

## महाराष्ट्राची विकासयात्रा थांबणार नाही

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधान परिषदेत ग्वाही

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. २६ फेब्रुवारी :** राज्यात गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेले अडथळ्यांचे राजकारण आता पूर्णपणे संपले असून, महाराष्ट्र विकासाच्या महामार्गावर सुसाट धावत आहे. विधान परिषदेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले की, प्रगत आणि सुरक्षित महाराष्ट्र घडवणे हेच सरकारचे अंतिम ध्येय आहे. भाषणाची सुरुवात करताना त्यांनी दिवंगत नेते अजित पवार यांच्या स्मृतींना उजाळा दिला आणि त्यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी व्यक्त करत, दादांनी नेहमीच विकासाच्या राजकारणाला प्राधान्य दिल्याचे नमूद केले.



औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्राचा दबदबा कायम असून, राज्य आजही देशात गुंतवणुकीसाठी पहिल्या क्रमांकावर आहे. देशाच्या एकूण जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा १३.५% इतका मोठा आहे. २०२४-२५ या वर्षात राज्याने १ लाख ६४ हजार ८७५ कोटींची परकीय गुंतवणूक खेचून आणली, जी देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या ३९% आहे. ही आकडेवारी महाराष्ट्रावरील जागतिक विश्र्वासाचे प्रतीक असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

केवळ कागदावर करार न करता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यावर सरकारचा भर आहे. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या ६ महिन्यात ९१ हजार कोटींची गुंतवणूक राज्यात आली आहे. दावोस येथे झालेल्या ३० लाख कोटींच्या ऐतिहासिक करारांपैकी तब्बल ८२% करार आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यावर आहेत. यामुळे आगामी काळात एआय (-ख), सेमीकंडक्टर्स आणि ग्रीन एनर्जी यांसारख्या आधुनिक क्षेत्रांत महाराष्ट्र क्रांती करेल.

मुंबईसह संपूर्ण राज्याचा चेहरामोहरा बदलणाऱ्या प्रकल्पांची माहिती देताना उपमुख्यमंत्र्यांनी 'वाढवण बंदर' आणि 'जागतिक क्षमता केंद्रा'चा उल्लेख केला. पालघरमधील वाढवण बंदर हे भविष्यात ५० लाख रोजगार निर्माण करणारे ठरेल. समृद्धी महामार्ग, कोस्टल रोड आणि अटल सेतू यांसारख्या प्रकल्पांमुळे दळणवळण वेगवान झाले असून, उद्योगांसाठी आवश्यक असलेली कनेक्टिव्हिटी राज्याला मिळाली आहे. विकास केवळ मुंबई-पुण्यापुरता मर्यादित न ठेवता तो राज्याच्या कानाकोपऱ्यात नेण्याचे धोरण सरकारने आखले आहे. उत्तर महाराष्ट्रात ५० हजार कोटींची, तर अहिल्यानगरमध्ये ११ हजार कोटींची गुंतवणूक प्रस्तावित आहे. विशेषतः छत्रपती संभाजीनगर हे शहर 'स्मार्ट इंडस्ट्रियल सिटी' म्हणून विकसित होत असून, ते भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांचे सर्वात मोठे हब बनेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

## तेलंगणात सफाई कर्मचाऱ्याला महिन्याला २ लाख तर इंजिनिअरला ७ लाख रूपये पगार; मात्र हे झालं कसं?

**तेलंगणा/वृत्तसंस्था :** गेल्या दशकभरात तेलंगणा राज्यावर शासकीय नोकरदारांच्या पगार आणि पेन्शन यांच्या खर्चाचा बोजा हा प्रत्येक महिन्याला ६ हजार कोटींच्या घरात गेला आहे. २०१४ मध्ये राज्याची निर्मिती झाल्यापासून जवळपास राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांचे पगार हे चार पटीनं वाढले आहेत. याबाबतची माहिती सरकारच्या एक वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे.

ज्यावेळी उर्जा विभागातील एका वरिष्ठ इंजिनिअरचा पगार हा महिन्याला ७ लाखाच्या आसपास पोहचला त्यावेळी ही माहिती तेव्हा पुढे आली. विशेष म्हणजे ग्रेटर हैदराबाद



महानगरपालिकेतील दीर्घकाळ सेवेत असलेल्या एका वरिष्ठ सफाई कर्मचाऱ्याचा देखील महिन्याचा पगार हा २ लाखाच्या आसपास पोहचला आहे.

अधिकाऱ्यांनी सरकारी कर्मचाऱ्यांना एवढा मोठा पगार कसा मिळतोय याबाबत स्पष्टीकरण देखील दिलं आहे. त्यांनी हे उच्च पगार हे पाठोपाठ झालेल्या पे रिव्हिजन्समुळं झाले आहेत. हे पे रिव्हिजन निवडणूक काळात झाले आहेत. तेलंगणामध्ये सर्वाधिक पगार हा राज्या उर्जा विभागातील चीफ इंजिनिअरचा आहे. दर चार वर्षांनी झालेल्या पे रिव्हिजननंतर त्यांचा महिन्याचा पगार हा ७ लाखाच्या घरात पोहचला आहे.

ग्रेटर हैदराबाद महानगरपालिकेतील सर्वसाधारण सफाई कर्मचाऱ्याचा पगार हा महिन्याला जवळपास ७० हजारापर्यंत आहे. तर नुकतेच नोकरीला लागलेल्या सफाई कर्मचाऱ्याचा पगार हा २८ हजारापर्यंत आहे. मात्र क्लास ४ मधील दीर्घ काळ सेवा बजावत असलेल्या वरिष्ठ सफाई कर्मचाऱ्याचा पगार हा महिन्याला २ लाखाच्या घरात जात आहे.

तेलंगणा सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार जरी गगनाला भिडले असले तरी राज्याचे उत्पन्न वाढत असल्यानं सरकार कर्मचाऱ्यांचे पराग वेळेवर किंवा थोडं उशिरा देऊ शकते. ताज्या C-G रिपोर्टनुसार २०२३-२४ या आर्थिक वर्षात राज्याच्या उत्पन्नाच्या ४५ टक्के रक्कम ही पगार, पेन्शन आणि कर्जावरील व्याज देण्यातच जात आहे.

जरी तेलंगणा सरकारसमोर अनेक आर्थिक अडचणी असल्या तरी तेलंगणाची अर्थव्यवस्था वाढत आहे. त्यांचा GSDP (राज्याचं एकूण उत्पादन) १० टक्क्यापेक्षा जास्त आहे. तसेच प्रती व्यक्ती उत्पन्न देखील भारतात सर्वाधिक आहे. ही माहिती मुख्यमंत्री कार्यालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. त्यामुळं सरकार कल्याणकारी योजनांसाठी प्रतिबद्ध असल्याचंही ते अधिकारी सांगतात.

## थोडक्यात...

### इंस्टाग्रामवर मोदींचीच हवा! १०० दशलक्ष फॉलोअर्सचा टप्पा ओलांडणारे जगातले पहिले राजकारणी

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शिरपेचात आणखी एक मनाचा तुरा रोवला गेला आहे. पंतप्रधान मोदींनी इंस्टाग्रामवर १०० दशलक्ष फॉलोअर्सचा टप्पा ओलांडला आहे. १०० दशलक्ष फॉलोअर्सचा टप्पा ओलांडणारे नरेंद्र मोदी हे जगातले पहिले राजकारणी ठरले आहेत. मोदी यांनी २०१४ मध्ये इंस्टाग्रामवर आपलं अकाउंट उघडलं होतं. मोदींच्या फॉलोअर्सची संख्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यापेक्षा दुप्पट आहे. ट्रम्प ४३.२ दशलक्ष फॉलोअर्ससह दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तर, इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो १५ दशलक्ष फॉलोअर्ससह, ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा १४.४ दशलक्ष फॉलोअर्ससह, तुर्कीचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान ११.६ दशलक्ष आणि अर्जेंटिनाचे अध्यक्ष जेवियर मायली ६.४ दशलक्ष यांचे इंस्टाग्रामवर फॉलोअर्ससह आहेत. पंतप्रधान मोदींनी पारंपारिक संवाद माध्यमांना बाजूला ठेवून, नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी इंस्टाग्राम सारख्या दृश्य आणि परस्परसंवादी प्लेटफॉर्मचा वापर केला.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी 'स्पीकर ऑफ द नेसेट'ने सन्मानित

**तेल अवीव :** पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवार २५ फेब्रुवारी रोजी सकाळी दोन दिवसांच्या इस्रायल दौऱ्यासाठी रवाना झाले. हा त्यांचा दुसरा इस्रायल दौरा आहे. पश्र्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्र्वभूमीवर, विशेषतः अमेरिका आणि इराणमधील बिघडत चाललेल्या संबंधांच्या पार्श्र्वभूमीवर, भारत-इस्रायल धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. यावेळी पंतप्रधान मोदींनी इस्रायली संसदेला संबोधित केले. दौऱ्याच्या पहिल्या दिवशी पंतप्रधान मोदींनी इस्रायली संसद नेसेटला संबोधित केले. यावेळी त्यांना इस्रायलच्या 'स्पीकर ऑफ द नेसेट' पदकाने सन्मानित करण्यात आले. हा मान मिळवणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान ठरले आहेत.

### शासकीय रुग्णालयांचे सेफ्टी ऑडिट

**मुंबई :** राज्यातील शासकीय रुग्णालयांत उपचारासाठी आणलेल्या आरोपींनी पलायन केल्याच्या वाढत्या घटनांची सरकारने गंभीर दखल घेतली आहे. पुणे येथील ससून रुग्णालयातून एका गंभीर गुन्ह्यातील आरोपी पळून गेल्याच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे 'सेफ्टी ऑडिट' (सुरक्षा परीक्षण) करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. येत्या सहा महिन्यांत हे ऑडिट पूर्ण केले जाईल, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी गुरुवारी (२६ फेब्रुवारी) विधानसभेत दिली.

### महाराष्ट्राची अर्थव्यवस्था तिपटीने वाढवली

**मुंबई :** महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०१२-१३ साली १३ लाख कोटी होती. गेल्या ११ वर्षांत ती ५१ लाख कोटींपर्यंत आली. आम्ही राज्याची अर्थव्यवस्था तिपटीने वाढवली. आता ९० लाख कोटींचा टप्पा गाठायचा आहे. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, ज्याने ६६० बिलियनचा टप्पा पार केला आहेत. इतर कुठलेही राज्य अर्थव्यवस्थेच्या बाबतीत आपल्याइतके पुढे नाही. त्यामुळे राज्य दिवाळखोरीत निघाल्याचे सांगून विरोधक जनतेची दिशाभूल करीत आहेत, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत केला.

### मुंबई पोलिसांच्या १२९० वाहनांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई :** मुंबईत आणि महानगर परिसरात घडलेल्या गुन्ह्याच्या ठिकाणी जलद गतीने पोहोचणे, १०० आणि ११२ या हेल्पलाइन क्रमांकावर आलेल्या तक्रारीच्या कॉलवर विनाविलंब पोहोचणे यासाठी मुंबई पोलीस दलात १२९० नवीन वाहनांचा समावेश करण्यात आला आहे. नरिमन पॉईंट येथील मुरली देवरा चौकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून आज या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले.कार्यक्रमाला गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (प्रशासन) एस. जयकुमार यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी उपस्थित होते.

### पोलादपूर एमआयडीसीचा प्रश्र्न मार्गी लागणार

**मुंबई :** रायगड जिल्ह्यातील पोलादपूर येथे औद्योगिक वसाहत स्थापन करण्याच्या मागणीने आता जोर धरला आहे. भाजप गटनेते आणि पोलादपूरचे सुपुत्र आमदार प्रवीण दरेकर यांनी (२६ फेब्रुवारी) विधानपरिषदेत या प्रश्नावर विचारणा केली.

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांना मरणोत्तर 'भारतरत्न'देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. २६ फेब्रुवारी :** भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील क्रांतिकारकांचे मुकुटमणी, द्रष्टे समाजसुधारक, प्रखर राष्ट्रभक्त स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्कार द्यावा, अशी मागणी भाजपचे आमदार प्रसाद लाड यांनी गुरुवारी विधान परिषदेत केली. संसदीय कार्यमंत्र्यांनी तसा प्रस्ताव केंद्रशासनाकडे पाठवावा आणि सभापतींनी हा ठराव एकमताने संमत करून घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.



या मागणीवर संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. ते म्हणाले, ''शासनाला असा प्रस्ताव आणावा लागेल. मी या परिषदेत असा प्रस्ताव मांडतो आणि त्यानंतर सभापतींनी त्यावर योग्य तो निर्णय घ्यावा'', असे त्यांनी नमूद केले.


गेल्या १० वर्षांहून अधिक काळापासून केंद्रात आणि राज्यातही स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या हिंदुत्वनिष्ठ विचारांवर चालणारे सरकार सत्तेत आहे. असे असूनही अद्याप विनायक दामोदर सावरकर यांना 'भारतरत्न' मिळालेला नाही. याविषयी हिंदुत्वनिष्ठ संघटनांकडून वारंवार खंत व्यक्त केली जात आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शतकोत्सवी कार्यक्रमात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनीही या विषयावर भाष्य केले होते. आता विधान परिषदेत ही मागणी झाल्याने सावरकरप्रेमींच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

## संजय राऊत यांना मोठा दिलासा! कथित शौचालय घोटाळा मानहानी प्रकरणात सत्र न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. २६ फेब्रुवारी :**

शिवसेना खासदार संजय राऊत यांना मुंबई सत्र न्यायालयानं मोठा दिलासा दिलाय. भाजपा नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांनी संजय राऊत याच्याविरोधात दाखल केलेल्या मानहानी प्रकरणात कोर्टानं राऊत यांना सबळ पुराव्यांअभावी निर्दोष मुक्त केलं आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश महेश जाधव यांच्यासमोर याप्रकरणी सुनावणी झाली. कथित शौचालय घोटाळा प्रकरणी संजय राऊत यांनी मेधा सोमय्यांविरोधात मानहानीकारक वक्तव्य केल्याबद्दल माझगाव कोर्टानं संजय राऊत यांना दोषी ठरवत शिक्षा सुनावली होती. या निकालाला राऊत यांनी सत्र न्यायालयात आव्हान दिलं होतं.



काय आहे शौचालय घोटाळा? - २०२२ मध्ये मीरा-भाईंदर शहरात १५४ सार्वजनिक शौचालय बांधण्यात आली होती. त्यातील १६ शौचालय बांधण्याचं कंत्राट मेधा सोमय्यांच्या युवक प्रतिष्ठानला मिळालं होतं. या कामात बनावट कागदपत्र सादर करून मीरा-भाईंदर महापालिकेच्या अधिकाऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला होता. पर्यावरणाचा ऱ्हास झाल्याचा आरोपही याप्रकरणी करण्यात आला होता. त्यानंतर ''घाण करून ठेवणारे म्हणतील पुरावे कुठे आहेत?, पुरावे

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### एअर कार्गो इंडिया ११व्या आवृत्तीपर्यंत पोहोचले

**मुंबई :** एअर कार्गो इंडियाची ११वी आवृत्ती आज मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे ट्रान्सपोर्ट लॉजिस्टिक इंडिया २०२६च्या पहिल्या आवृत्तीसोबत सुरू झाली. या उपक्रमामुळे एअर कार्गो आणि मल्टीमोडल लॉजिस्टिक्स उद्योगासाठी एक केंद्रित इ२इ मार्केटप्लेस म्हणून या मंचाची भूमिका अधिक बळकट झाली आहे. ट्रान्सपोर्ट लॉजिस्टिक इंडिया २०२६साठी एबी डिव्हिलियर्स यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषणा करण्यात आली आहे. शिस्त, अनुकूलनक्षमता आणि उच्च कार्यक्षमतेच्या मानसिकतेसाठी ओळखले जाणारे डिव्हिलियर्स यांचा सहभाग ऑपरेशनल उत्कृष्टता, अचूकता आणि अंमलबजावणीवर या कार्यक्रमाचा भर अधोरेखित करतो-जे गुण सर्वोच्च दर्जाच्या क्रीडा क्षेत्रासह जागतिक दर्जाच्या लॉजिस्टिक्सची ओळख आहेत.

### हरियाणा सरकारच्या विभागाने आयडीएफसी फर्स्ट बँकेचे मानले आभार

**मुंबई :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने चंदीगडमधील आपल्या एका शाखेत घडलेल्या घटनेच्या खुलाशा संदर्भात आपली तत्वनिष्ठ भूमिका आणखी स्पष्ट केली आहे. सदर घटना हरियाणा सरकारच्या काही विभागांच्या खात्यांशी संबंधित असून त्याबाबत बँकेने अलीकडेच माहिती जाहीर केली होती. प्राथमिक निष्कर्षांनुसार असे दिसून आले आहे की, शाखेतील काही कर्मचाऱ्यांनी बनावट दस्तऐवज आणि पेमेंट सूचना मंजूर करून फसवणूक केली आहे. या प्रकारामध्ये बाह्य व्यक्तींशी संगनमत असण्याची शक्यता आहे आणि संबंधित विभागांकडून सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असतानाही बँकेने हरियाणा सरकारच्या संबंधित विभागांनी दावा केलेली १०० टक्के मुद्दल आणि व्याजाची रक्कम त्वरित अदा केली आहे. ही एकूण रक्कम ५८३ कोटी रुपये आहे. अदा करण्यात येणाऱ्या अंतिम रकमेत भविष्यातील कोणताही दावा किंवा ताळमेळ यानुसार फेरबदल होऊ शकतो.

### सायबर सुरक्षा जागरूकता पसरविण्यासाठी 'सायबर सेफ गोवा' मोहीम सुरू केली

**मुंबई :** 'इंडियाज क्रिप्टो कोच' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतातील सर्वात मोठ्या क्रिप्टो एक्सचेंज कॉइनडीएक्सने गोवा पोलिसांसोबत भागीदारी केली आहे. त्यांनी एकत्रितपणे 'सायबर सेफ गोवा' मोहीम सुरू केली आहे. गुंतवणूकदारांना शिक्षित करण्याच्या कंपनीच्या प्रयत्नांचा हा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्यामुळे देशभरात डिजिटल जागरूकता आणि सुरक्षितता मजबूत करण्याच्या त्यांच्या सततच्या वचनबद्धतेला आणखी बळकटी मिळते.भारताचा क्रिप्टो कोच म्हणून, कॉइनडीएक्सने नेहमीच जबाबदार क्रिप्टो दत्तक आणि गुंतवणूकदार जागरूकतेवर भर दिला आहे. प्लॅटफॉर्मने नेहमीच माहितीपूर्ण आणि जागरूक डिजिटल वापरकर्ते तयार करण्याची जबाबदारी घेतली आहे. 'सायबर सेफ गोवा' या मोठ्या मोहिमेचा एक भाग आहे, जो आता क्रिप्टोपुरता मर्यादित नाही. देशात ऑनलाइन धोके वाढत असताना, या मोहिमेत सायबर सुरक्षा आणि डिजिटल स्वच्छतेची विस्तृत श्रेणी समाविष्ट आहे.

### फ्रँचायझी इंडियाने विस्ताराला गती दिली

**पुणे:** २०११ मध्ये स्थापन झालेल्या फ्रान्सच्या बॅगेलस्टाइन या बॅगेलस्टाइनने फिनिक्स मार्केटसिटी, विमाननगर, पुणे येथे पाचव्या स्टोअरच्या उद्घाटनासह भारतात आपली उपस्थिती मजबूत केली आहे. ब्रँडच्या भारतातील प्रवासात आणखी एक मैलाचा दगड म्हणून, हे आउटलेट देशातील बॅगेलस्टाइनचे शुद्ध शाकाहारी रेस्टॉरंट स्वरूप म्हणून देखील वेगळे आहे, जे भारतीय ग्राहकांच्या विकसित होत असलेल्या जीवनशैलीच्या पसंतींशी सुसंगत आहे. पुणे हे भारतातील सर्वात उत्साही जीवनशैली आणि अन्न गंतव्यस्थानांपैकी एक म्हणून उदयास येत असताना, हे शहर तरुण व्यावसायिक, विद्यार्थी, उद्यो-जक आणि जागतिक कामगारांना आकर्षित करत आहे जे सतत आंतरराष्ट्रीय पाककृती आणि सोयीस्कर गॉरमेट डायनिंग फॉरमॅटचा शोध घेत आहेत.

### एण्ड टीव्ही कलाकारांच्या खास होळी स्किनकेअर टिप्स; रंगोत्सवातही चमकदार त्वचेचा मंत्र

**छत्रपती संभाजीनगर :** होळीच्या पार्श्र्वभूमीवर एण्ड टीव्ही वरील कलाकारांनी त्वचा संरक्षणासाठी प्रॅक्टिकल मार्गदर्शक तत्त्वे शेअर केली आहेत. 'हे भगवान – कितना बदल गया इंसान!'मधील अक्षया नाईक होळीपूर्वी मॉइश्र्चरायझर व खोबरेल तेलाचा वापर सुचवतात. 'घरवाली पेडवाली'मधील प्रियमवदा कांत बदाम तेल, सनस्क्रीन आणि ॲलोवेरा मास्कचा सल्ला देतात. 'हप्पू की उलटन पलटन'मधील गीतांजली मिश्रा ऑलिव्ह तेल व हायड्रेशनवर भर देतात, तर 'भाबीजी घर पर है २.०'मधील विदिशा श्रीवास्तव एक्सफोलिएशन व हळद-दही फेसपॅक उपयुक्त ठरतो असे नमूद करतात.

### तरूण खन्ना उज्जैनमध्ये साजरा करणार आध्यात्मिक वाढदिवस; 'हे भगवान – कितना बदल गया इंसान!'च्या शूटिंगला रंग

**छत्रपती संभाजीनगर :** लोकप्रिय अभिनेता तरूण खन्ना यंदा वाढदिवस उज्जैन येथे साजरा करणार आहेत. सध्या ते एण्ड टीव्ही वरील 'हे भगवान – कितना बदल गया इंसान!'मध्ये भगवान महादेवांची भूमिका साकारत आहेत. वाढदिवसानिमित्त ते श्री महाकालेश्र्वर ज्योतिर्लिंग मंदिर येथे दर्शन घेणार आहेत. आध्यात्मिक ऊर्जा आणि व्यावसायिक बांधिलकी यांचा संतुलित संगम साधत, घाटांवरील सूर्योदय अनुभवणे व स्थानिक संस्कृतीचा आस्वाद घेण्याची त्यांची योजना आहे. मालिका लवकरच एण्ड टीव्हीवर, तसेच नएए५ वर उपलब्ध होणार आहे.

### विकसित भारत मिशनसोबत वाटचाल

**नाशिक :** ट्रायडंट लिमिटेड ही ट्रायडंट ग्रूपची मुख्य कंपनी आणि भाारतातील एक आघाडीचा उद्योग समूह आहे. या कंपनीने आपल्या उत्पादन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भरतीची प्रक्रिया जाहीर केली असून यातून ३००० हून अधिक कर्मयोगींना कामावर घेतले जाणार आहे.

# हनुमंत पवार यांच्यावरील हल्ल्याचा निषेध; आरोपींवर कठोर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लासूर स्टेशन, दि. २६ फेब्रुवारी :** हनुमंत पवार यांच्यावर पुणे येथे झालेल्या कथित हल्ल्याच्या निषेधार्थ लासूर स्टेशन शहर काँग्रेस कमिटीने तीव्र आंदोलनाची भूमिका घेतली आहे. प्रदेश प्रवक्ते म्हणून कार्यरत असलेले पवार हे तळागाळातील कष्टकरी व शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले नेतृत्व असून इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये ते पक्षाची भूमिका ठामपणे मांडतात.



या पार्श्र्वभूमीवर पुण्यात पुणे येथे तुषार जामधडे याने सहकाऱ्यांसह कट रचून हल्ला केल्याचा आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला आहे. हा हल्ला म्हणजे मतभेद दडपण्याचा प्रयत्न असून लोकशाही मूल्यांवर आघात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

भारताच्या लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे. अशा प्रकारे कोणाचाही आवाज दाबण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही, असे शहर काँग्रेसने स्पष्ट केले आहे. आरोपी तुषार जामधडे व त्याच्या सहकाऱ्यांवर तात्काळ व कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

या संदर्भात लासूर स्टेशन शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने स्थानिक पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. पीएसआय काळे यांनी निवेदन स्वीकारले.

यावेळी शहराध्यक्ष किशोर पवार, मोहनराव खंडागळे, भास्कर बनसोडे, ज्ञानेश्र्वर वाघचौरे, रिचर्ड बत्तीशे, सिद्धार्थ गायकवाड, नागेश बागुल, नसीर टेलर, रियाज भाई यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शहर काँग्रेसच्या वतीने या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला असून दोषींवर त्वरित कारवाई न झाल्यास पुढील आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.



## स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साठाव्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभजीनगर, दि. २६ फेब्रुवारी :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या साठाव्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विक्रमादित्य शाखा व टिळकनगर सोसायटीतर्फे रोपळेकर दवाखान्याजवळील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी राजीव जहागीरदार यांनी सावरकरांच्या जिद्दीचा व साहित्यनिर्मितीच्या सामर्थ्याचा उल्लेख केला. चित्रपटासाठी गाणे सुचावे म्हणून कवींना विविध सुविधा दिल्या जातात; परंतु अंदमानातील कठोर कारावासात कोलू फिरवणे, काथ्या कुटणे, आजारपण अशा अमानुष परिस्थितीतही सावरकरांनी कमलासारखे महाकाव्य रचले, हे त्यांच्या अद्वितीय प्रतिभेचे द्योतक असल्याचे त्यांनी सांगितले. लेखनासाठी कागद-शाई नसताना भिंतीवर कविता लिहून ती मुखोद्गत करण्याची त्यांची चिकाटी त्यांना इतिहासातील प्रभावी व्यक्तिमत्त्व ठरवणारी ठरली, असे त्यांनी नमूद केले. चिन्मय मिशनचे पूज्य स्वामी आत्मेशानंद महाराज यांनी सावरकर हे स्वातंत्र्यसैनिक, कवी, लेखक, तत्त्वचिंतक व समाजसुधारक होते, असे सांगितले.

## हिंदू संमेलनानिमित्त भव्य शोभायात्रा; धर्मध्वज स्थापना उत्साहात

### हिंदु संमेलन निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. २६ फेब्रुवारी :** फाल्गुन शुद्ध द्वादशी, शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी आयोजित हिंदू संमेलनाच्या पार्श्र्वभूमीवर बिडकीन शहरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. गुरुवार दि. २६ फेब्रुवारी रोजी भव्य शोभायात्रा, धर्मध्वज स्थापना,भूमिपूजन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सकल हिंदू माता-भगिनी, युवक आणि वारकरी संप्रदायातील भाविकांच्या सहभागामुळे शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात धर्मध्वज स्थापनेने व भूमिपूजनाने झाली. हभप अमोल महाराज भवर, श्रीरामजी पांडे,अनिल गवळी, दिवाकर कुलकर्णी, केशव लांडगे, ड. राजेंद्र गोर्डे, अध्यक्ष विजय शेजुळ, संतोष मोदी, गणेश काळे, शिवप्रसाद औटी, बबन काळे, लहु कांतबने, मनोज दौंडे, ज्ञानेश्र्वर औटी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.यावेळी सहायक पोलिस निरीक्षक निलेश शेळके, जिल्हा परिषद सदस्य मनोज पेरे, सरपंच अशोक धर्मे, उपसरपंच किरण गुजर, काकासाहेब टेके, ग्रामपंचायत सदस्य मधुकर सोकटकर, कल्याण शिंदे, सुभाष जाध, गणेश, बाबा धर्मे, उमेश तिवारी, रविंद्र आगाज, रुषिकेश आगाज, कारभारी सोनवणे, संजय औटी, विजय पडियाल, रोहित निनाळे, किशोर धर्मे, सोमनाथ निनाळे, मच्छिंद्र तांबे, गणेश मिसाळ, अक्षद हंचाटे आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. श्री सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या मैदानावरून शोभायात्रेला प्रारंभ झाला. मारवाडी



गल्ली, सोनार गल्ली, कोकणवेस मारोती मंदिर, तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गाने मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, भगव्या पताकांचा फडफडणारा नजारा आणि वारकरी संप्रदायाच्या मृदंग-वीणा-टाळांच्या नादात संपूर्ण शहर दुमदुमून गेले होते.

महिला व नवतरुणांची भव्य उपस्थिती हे या शोभायात्रेचे वैशिष्ट्य ठरले. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या माता-भगिनींनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

## एमजीएम विद्यापीठात स्वयंभू - २०२६ चे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २६ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जेएनईसीचे स्वयंभू – २०२६ या तंत्रसंमेलनाचे उद्घाटन शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता होणार आहे. रुक्मिणी सभागृहात होणाऱ्या उद्घाटन सोहळ्यास इंटेलीक्यू लॅब्सचे संस्थापक सुरेश शक्करवार, लॉयल इन्फोसर्व्हिसेसचे संस्थापक पुनीत धिंग्रा, व्हीएस४ इंडिया बायोमेडचे संस्थापक मनोज तलवारे, पीआयटी लॅब्सचे संस्थापक महेश कुलकर्णी आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

उद्घाटन प्रसंगी एजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.हरिरंग शिंदे, जेएनईसीच्या प्राचार्या डॉ.विजया मुसांडे आणि स्वयंभूच्या समन्वयिका डॉ. विजया प्रधान उपस्थित असणार आहेत.

'स्वयंभू' हा तंत्राविष्कार संमेलन जेएनईसीत दरवर्षी आयोजित होत असते. दिनांक २७ आणि २८ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या स्वयंभूसाठी राज्यभरातून स्पर्धकांनी नोंदणी केलेली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत वैविध्यपूर्ण आणि कल्पक स्पर्धा, गेमींग आणि तंत्रप्रतिभेला यात वाव दिलेला आहे.

उद्घाटन सोहळा झाल्यानंतर 'द इंजिनिअर्स रोडमॅप: एम्प्लॉयबिलिटी, आंत्रप्रेन्योरशिप अँड लाइफलाँग लर्निंग फॉर अ सस्टेनेबल फ्यूचर इन द एआय-ड्रिव्हन एरा' या विषयावर समूह चर्चेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## शेतक-यांनो, कापसाचे उत्पन्न आणि जमिनीचे आरोग्य जपा

**मुंबई :** बेकायदेशीर मार्गाने विकल्या जाणा-या विनापरवाना एचटीबीटी कापूस बियाण्यांबाबत कृषी तज्ज्ञ आणि बीज उद्योगातील प्रतिनिधीनींनी कापूस उत्पादक शेतक-यांना सातत्याने सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अनधिकृत मार्गांनी विकल्या जाणा-या या बियाण्यांची जमिनीत उगवण्याची क्षमताही नसते. या बियाणांना शास्त्रीय मान्यता नसते. अशा बियाणांमुळे पिकाची वाढ अनिश्र्चित राहते. परिणामी, शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतक-यांनी केवळ अधिकृत विक्रेत्यांकडूनच प्रमाणित बियाणे खरेदी करावे, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आले आहे.बाधित प्रदेशातून मिळालेल्या क्षेत्रीय अहवालांनुसार, अशा अनधिकृत बियाण्यांच्या वापरामुळे शेतक-यांच्या उत्पादनात मोठी घट झाल्याचे समोर आले आहे. हवामानातील बदल, किड्यांचा वाढता प्रादुर्भाव आणि बेकायदेशीर बियाण्यांचा वापर या तिहेरी संकटामुळे १० ते १५ क्विंटल कापूस पिकणा-या शेतात आता केवळ ४ ते ६ क्विंटलपर्यंत उत्पादनात घट झाली आहे. या घटत्या उत्पादनामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.

## खुलताबाद पं स. सभापती पदाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादीच्या हालचाली

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. २६ फेब्रुवारी :** खुलताबाद पंचायत समिती सभापती व उपसभापतीपदासाठी निवडणूक कार्यक्रम अद्याप जाहीर झाला नसला तरी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने राजकीय समीकरणे जुळविण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.



सभापतीपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने दावेदारी सांगितली असून ओबीसी गणातून निवडून आलेल्या सदस्यालाच सभापती करावे अशी मागणी मा .रायुकॉंचे तालुकाध्यक्ष अजिनाथ सांळुके यांनी केली आहे.

पंचायत समिती च्या झालेल्या निवडणुकीत एकूण ६ सदस्या पैकी ३ भाजप, २ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार, १ उध्दव-सेना असे पक्षीय बलाबल असून ओबीसी महिलासाठी सभापतीपद राखीव असल्याने बाजार सांवगी गणातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या अंजनाबाई कचरू सांळुके या विजयी झाल्या असून सभापतीपदासाठी ओबीसी गणातीलच सभापती व्हायला पाहिजे अशी आमची ठाम भुमिका आहे. यावेळी अधिक बोलतांनी अजिनाथ सांळुके म्हणाले आमच्याकडे तीन सदस्य असून निवडणुकीसाठी भाजप- राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाची महायुती होण्यासाठी वरिष्ठ पातळीवर चर्चा होऊ शकते असेही ते म्हणाले.

## डॉ.प्रमोद अंबादासराव पवार यांना जागतिक मान्यता: 'भारत रत्न आयकॉन ऑफ इंडिया' पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २६ फेब्रुवारी :** शैक्षणिक समुदायासाठी एक ऐतिहासिक यशस्वी क्षणी डॉ. प्रमोद अंबादासराव पवार यांना प्रतिष्ठित भारत रत्न आयकॉन ऑफ इंडिया पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.दि.२२ फेब्रुवारी २०२६ रोजी घोषित केलेले हे उच्च-स्तरीय सन्मान त्यांच्या अपूर्व बौद्धिक नेतृत्व आणि जागतिक साहित्यिक विचारसरणीमध्ये केलेल्या परिवर्तनात्मक योगदानाचा गौरव करतो.



**संस्थेचा अभिमान आणि समर्थन**

हा सन्मान त्यांच्या व्यावसायिक मंडळात आनंदाची लहरी निर्माण करत आहे.अध्यक्ष रंगनाथ काळे,आणि सचिव प्रकाश काळे,सह संत ज्ञानेश्र्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार,उप प्राचार्य डॉ.आर.के.बारोटे यांनी डॉ.पवार यांना या जागतिक टप्प्यावर पोहोचण्यासाठी प्रेरित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.घोषणेनंतर, सर्व शिक्षक व गैर-तांत्रिक कर्मचारी यांनी त्यांच्या मनःपूर्वक अभिनंदन केले, हे संस्थेसाठी अभिमानास्पद क्षण ठरले.

**द प्रमोद इफेक्ट या नवप्रवर्तनात्मक संकल्पनेची सुरुवात**

डॉ. पवार जे ट्रान्स-डिकन्स्ट्रक्शन थिअरी ऑन मोनिझम आणि थिअरी ऑफ इंटरप्रिटेशन्स या तत्त्वज्ञानाचे जनक म्हणून ओळखले जातात, त्यांना विशेषतःजागतिक साहित्यिक आयकॉन या श्रेणीत सन्मानित करण्यात आले. त्यांच्या संशोधनात पुढील वैशिष्ट्यांचा समावेश आहे:

द प्रमोद इफेक्ट: परिवर्तनात्मक संशोधनाला प्रोत्साहन देणारा आणि आधुनिक जागतिक साहित्यात समृद्धी आणणारा संकल्पनात्मक ढाचा.

नविन संशोधन दृष्टिकोन: डिकन्स्ट्रक्शन, पोस्ट-स्ट्रक्चरलिझम आणि पोस्ट-कोलोनियल अभ्यास यांसारख्या जटिल परंपरांशी संवाद साधणारे संशोधन.

सार्वत्रिक उपयुक्तता: मोनिझमवरील त्यांच्या तत्त्वज्ञानामुळे जागतिक नवप्रवर्तन आणि सर्व शैक्षणिक क्षेत्रांमध्ये परस्परसंबंधित संशोधनासाठी अद्वितीय दृष्टिकोन.

**दूरदर्शी वारसा**

हा पुरस्कार संस्थेचे संस्थापक डॉ.राजवीर शर्मा यांनी सादर केला,डॉ. पवार यांच्या दूरदर्शी शास्त्रीय अभ्यास आणि दीर्घकालीन प्रभाव यांचे मान्यतेचे प्रतीक आहे.

त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या मूलभूत तत्वांना त्यांच्या नावाच्या अक्षरांद्वारे प्रतिपादित करून Permanence, Redemption, Almighty/ Absolute, Monism, Omnipresence, आणि Shunyawada मधील Dualism (MTAm°=0) डॉ. पवार प्राचीन ज्ञान आणि २१व्या शतकातील साहित्यिक समीक्षण यांच्यातील अंतर जुळवत आहेत.

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र.१३३/२०२६

अर्जदार:- १) कडुबाई भ्र. मधुकर फाजगे, वय ८३ वर्षे धंदा मजुरी रा. कायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) आनंद मधुकर फाजगे (फासगे) वय ५५ वर्षे धंदा नौकरी, रा. कायगाव ता. गंगापुर, ह.मु. सॅलिसबरी पार्क, मिशन, गुलटेकडी मार्केट यार्ड, पुणे ३) शकुंतला भ्र. मनोहर फाजगे, वय ५२ वर्षे धंदा मजुरी रा. कायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) किरण मनोहर फाजगे, वय ३८ वर्षे धंदा मजुरी रा. कायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) चरण मनोहर फाजगे, वय ३६ वर्षे धंदा मजुरी रा. कायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ६) संदिप मनोहर फाजगे, वय ३५ वर्षे धंदा मजुरी रा. कायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ७) अतुल मनोहर फाजगे, वय ३१ वर्षे धंदा मजुरी रा. कायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी या न्यायालयात त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. जी.बी. चव्हाण यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, मधुकर आसाराम फाजगे हे मौजे कायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते, ते दिनांक २५/०६/२००६ रोजी मौजे कायगाव ता. गंगापुर येथे मयत झालेले आहेत. मयतास दोन मुले नामे आनंद मधुकर व मनोहर मधुकर असे होते त्यापैकी मनोहर मधुकर फाजगे हे दिनांक १३/०४/१९९४ रोजी मौजे कायगाव ता. गंगापुर येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ ही मयत मधुकर आसाराम फाजगे यांची पत्नी असुन अर्जदार क्र.२ हा मुलगा आहे, अर्जदार क्र.३ ही मयत मुलाची पत्नी म्हणजेच सुन असुन अर्जदार क्र.४ ते ७ हे नातु आहेत. मयत मधुकर आसाराम फाजगे यांना अर्जदार क्र.१ ते ७ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे पश्र्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा

विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०६/०४/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २५/०२/२०२६ रोजी दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक.

सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर**

दि.कि.अर्ज क.१२५/२०२६

अर्जदार :-१) परसराम पि. नामदेव हिवाळे, वय ४८वर्षे, धंदा शेती, रा. गाजगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) यमुनाबाई भ्र. शंकरराव कांबळे, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. आसेगाव, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३). रत्नाबाई भ्र. सुभाष फाळके, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. गाजगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर,

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. एस. के. नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार हे आपसात भाउ बहीन असुन अर्जदारांचे वडील नामे नामदेव पि. रामचंद्र हिवाळे हे दिनांक १९/०२२०२२ रोजी मौजे गाजगाव, ता. गंगापुर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. अर्जदारांची आई चंद्रभागाबाई भ्र नामदेव हिवाळे ही दिनांक १५/०७/२०२४ रोजी मयत झाली आहे. मयत नामदेव यांचे आई वडील हे फार वर्षापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयत नामदेव यांचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी दिले.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर,
ता. गंगापुर

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश. (क. स्तर) न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ७७६/२०२५

अर्जदार:-१) शिवाजी आण्णा थोरात, तरा ४३ वर्ष, चंदा शेती, रा. खडक नारळा ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) कांता क्ष. बलभिम हारदे, वय ४२ वर्ष, चंदा शेती, रा. वरखेड ता. नेवासा जि. अहमदनगर

विरुध्द

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण:-बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. आर. शिराळे गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क १ व २ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असुन अर्जदार क १ व २ हे आपसात नात्याने सख्खे भाउ-बहिन आहे अर्जदार क १ व २ यांचे वडील नामे आण्णा गजु थोरात हे दि.०९/१०/२०१८ रोजी खडक नारळा ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयताची पत्नी म्हणजेच अर्जदार क १ व २ यांची आई नामे शांताबाई भ्र. आण्णा थोरात हि दि. ०५/१०/२०२४ रोजी खडक नारळा ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली असुन मयतांना अर्जदार क १ व २ हे मुलगा व विवाहीत मुलगी या नात्याने कायदेशीर वारसदार आहेत. मयतांना अर्जदार यांच्याशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत आण्णा गजु थोरात यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत आण्णा गजु थोरात यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे करीता सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि. २४/ ०२ / २०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

प्रकरणात पु. ता. दि.२०/०३/२०२६

लिपिक.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## संक्षिप्त वृत्त...

### स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यामंदिर सायाळाचे एनएमएमएस परीक्षेत यश; १६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

**परभणी,/प्रतिनिधी:-** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या एनएमएमएस इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यामंदिर सायाळाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. २८ डिसेंबर रोजी झालेल्या या परीक्षेत विद्यालयातील २४ नियमित विद्यार्थ्यांपैकी तब्बल १६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले.

यामध्ये कु. दिव्या माधव खटिंग (१४१), कु. अंकिता किशन खटिंग (१०९), चि. शंतनु मोतीराम वैद्य (१०७), कु. गायत्री ज्ञानोबा खटिंग (१०३), कु. हर्षदा कोंडीबा वाघ (१०१), चि. ओंकार भरत तारे (९०), चि. समर्थ उत्तमराव पारवे (८९), कु. गौरी लक्ष्मण वाघ (८७), कु. गंगासागर पांडुरंग शिंदे (८१), कु. समृद्धी अर्जुन शिंदे (७९), चि. संभव मरीबा ढेरे (७८), कु. कांचन परमेश्वर काळे (७७), कु. राधा गणेश बोबडे (७५), चि. वैभव विठ्ठल काळे (७५), चि. गणेश जय सरोदे (७४) आणि कु. ज्ञानेश्वरी अंबादास शिंदे (७२) यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना विभागप्रमुख पंडगू, मार्गदर्शक पामे तसेच विषय शिक्षक आंबेकर, सौ. जोशी, राठोड, सौ. सूर्यवंशी, सौ. पांढरे व देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशालेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

दरम्यान, या यशाबद्दल नूतन विद्या समितीचे अध्यक्ष विजयरावजी जोशी, उपाध्यक्ष अनिलराव अष्टूरकर, दिलीपराव कुलकर्णी, सचिव संतोष धारासुरकर, सहसचिव अनंत पांडे, कोषाध्यक्ष श्रीनिवास मुंदडा, संचालक वेंकटेश तोरंबेकर, सौ. मालेगावकर, सौ. मंगरूळकर, रामराव खटिंग, मुख्याध्यापिका सौ. देशपांडे तसेच सायाळा येथील सरपंच सौ. पद्मिनीताई खटिंग यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले.

### शक्तीपीठ महामार्गाबाबत ५ मार्च रोजी बाधीत शेतकऱ्यांबरोबर चर्चा : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आश्वासन : मनोज जरांगे पाटील यांची मध्यस्थी

**परभणी,/प्रतिनिधी :** शक्तीपीठ महामार्गाबाबत येत्या ५ मार्च रोजी बाधीत शेतकऱ्यांबरोबर एका बैठकीद्वारे चर्चा केली जाईल, असे ठोस आश्वासन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शक्तीपीठ बाधित शेतकऱ्यांनी बेमुदत उपोषण सुरु केले. त्यास बुधवारी (दि.२५) संध्याकाळी ४ वाजता मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली. पाठोपाठ त्यांचे म्हणणे ऐकुण घेतले व महसूलमंत्री बावनकुळे यांच्याशी संपर्क साधला. त्यावेळी महसूलमंत्र्यांनी येत्या ५ मार्चला बैठकीचे आश्वासन दिले. त्यामुळे शक्तीपीठबाधित उपोषण कर्त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते पाणी घेऊन हे उपोषण स्थगित केले.यावेळी खासदार संजय जाधव, महापौर सय्यद इकबाल उपस्थित होते.

यावेळी मराठा आरक्षणाचे नेते पाटील म्हणाले की शेतकऱ्यांची मागणी नसतानाही शक्तीपीठ महामार्गाचा घाट घातला जात आहे, पोलिसीबळाचा वापर करून सरकारने शेतकऱ्यांचे जमीन बळजबरी मोजणी करू नये, असे म्हटले.

### मालमत्ता कर थकविणाऱ्या शासकीय कार्यालयांना सील ठोका भारतीय जनता पार्टीद्वारे महापालिका आयुक्तांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कर थकविणाऱ्या शासकीय कार्यालयांना महापालिका प्रशासनाने महापालिका अधिनियम मधील तरतूदीनुसार व स्वायत्ता संस्थेच्या अधिकारानुसार सील ठोकावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचति सदस्य रितेश झांबड जैन यांनी महापालिका आयुक्तांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती मजबुत व्हावी, तरच आपण शहरवासीयांना मूलभूत सोयी-सुविधा देऊ शकु, त्यासाठी महापालिका प्रशासनाने मालमत्ता कर अधिकाधिक वसूल व्हावा, यासाठी प्रोत्साहनपर उपाययोजनांचा अवलंब केला पाहिजे. विशेषतः जो प्रभाग शंभर टक्के मालमत्ता कर भरेल, त्या प्रभागात किमान १ कोटींची विकास कामे बक्षीस म्हणून केली पाहिजेत. म्हणजेच त्या बाबीची प्रेरणा अन्य प्रभाग घेतील, असे नमूद करीत सदस्य रितेश झांबड यांनी महापालिका हद्दीत जवळपास १ लाख घरे आहेत. त्यातील किती घरे नियमितपणे मालमत्ता कर भरतात, किती घरे बांधलेली आहेत, किती प्लॉट रिकामे आहेत, याचा तपशील प्रत्येक बिल कलेक्टर मार्फत सात दिवसांच्या आत मागावा, ज्या ठिकाणी पक्की घरे बांधलेली आहेत. त्यांना टॅक्स लागतो की नाही, हे ही थर्ड पार्टी तपासावे व चालू आर्थिक वर्षात मनपाची सर्व थकबाकी वसूल व्हावी, या दृष्टीने प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा झांबड यांनी व्यक्त केली.

### नांदेडमध्ये तीन दिवशीय ''संगीत शंकर दरबार'' : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते उद्घाटन : संगीत सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** शास्त्रीय गायन-वादनासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असलेला संगीत शंकर दरबार यंदा २२ व्या वर्षात पदार्पण करत असून आजपासून नांदेडकरांना संगीताची समृद्ध मेजवानी लाभणार आहे. यशवंत महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात या त्रिदिवसीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

आज बुधवार २५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण तर भोकरच्या आमदार श्रीजयाताई चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. याच कार्यक्रमात डॉ. राम बोरगावकर यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. उद्घाटनानंतर अनुपमा जोशी यांचे सरोद वादन तसेच रुचिरा केदार आणि पंडित रघुनंदन पणशीकर यांच्या शास्त्रीय गायनाचा रसिकांनी आस्वाद घेतला.उद्या गुरुवार २६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन माजी आमदार सौ. अमिताताई चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. शारदा भवन एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणी सदस्या डॉ. सुजयाताई चव्हाण उपस्थित राहणार आहेत. या दिवशी आदित्य मोडक व अनुराधा कुबेर यांचे शास्त्रीय गायन तसेच डॉ. मैसूर मंजुनाथ आणि मैसूर नागराज यांची व्हायोलीन जुगलबंदी हा विशेष आकर्षणाचा भाग ठरणार आहे. तर शुक्रवार २७ रोजी सकाळी ६ वाजता कुसुम सभागृहात मराठी दिनानिमित्त मंगेश बोरगावकर व संच यांचा 'माय मराठी, सूर मराठी' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत यांच्या हस्ते होणार आहे.या त्रिदिवसीय संगीत सोहळ्यास हजारोच्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डी. पी. सावंत यांनी केलेआहे.

# दैनंदिन कचरा संकलनातील अडचणी दूर करा : महापौर सय्यद इकबाल यांचे निर्देश : मनपा आयसीटी बेस स्कॅनिंग संदर्भात बैठक

**परभणी ,/प्रतिनिधी-** दैनंदिन कचरा संकलनातील अडचणी दूर कराव्यात, आयसीटी बेस स्कॅनिंगसाठी शहरातील विविध ठिकाणी लावण्यात आलेल्या क्यूआर कोडची पाहणी करावी व खराब क्यूआर कोड तातडीने बदलून नवीन क्यूआर कोड बसविण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, असे आदेश महापौर सय्यद इकबाल यांनी दिले आहेत.

आयसीटी बेस स्कॅनिंग प्रणालीसंदर्भात २४ फेबुवारी रोजी महापौर सय्यद इकबाल यांच्या कक्षात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. शहरातील दैनंदिन कचरा संकलनातील अडचणी तसेच कचरा उचलताना स्कॅनिंगची आवश्यकता या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस मनपा सदस्य गुलमीर खान, मुख्य स्वच्छता अधिकारी करण गायकवाड, शहर समन्वयक तुराब खान, आयटीआय लिमिटेड कंपनीचे प्रतिनिधी व सुपरवायझर तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. यावेळी महापौर सय्यद इकबाल यांनी संबंधित एजन्सींना घंटागाड्या नियमित व सुरळीत चालू ठेवण्याचे निर्देश दिले. तसेच आयसीटी बेस स्कॅनिंगसाठी शहरातील विविध ठिकाणी लावण्यात आलेल्या क्यूआर कोडची पाहणी करावी, काही ठिकाणी क्यूआर कोड खराब झाल्याचे तसेच त्यावर रंगरंगोटी झाल्याने स्कॅनिंगमध्ये अडथळे येत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित कंत्राटदाराच्या प्रतिनिधींना खराब क्यूआर कोड तातडीने बदलून नवीन क्यूआर कोड बसविण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. यासोबतच नागरिकांमध्ये क्यूआर कोडच्या वापराबाबत जनजागृती करण्याचेही निर्देश देण्यात आले.

आपला शहर, आपला वॉर्ड आणि आपला परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. घरातील कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीतच द्यावा. नागरिकांच्या सहकार्यामुळेच परभणी शहर स्वच्छ व सुंदर होऊ शकते, असे आवाहन महापौर सय्यद इकबाल तसेच महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले.




## सिंगणापुर फाट्यावरील 'रास्तारोको' प्रकरणी खासदारांसह आंदोलक शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल

**परभणी,/प्रतिनिधी:** शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा या मागणीसाठी तालुक्यातील सिंगणापूर फाटा येथे सोमवारी (दि. २३) रास्ता रोको करण्यात आले होते. या प्रकरणी आयोजक खासदार संजय जाधव यांच्यासह आंदोलक शेतकऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातून जात असलेल्या शक्तिपीठ महामार्गासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या जमीन अधिग्रहण मोजणीच्या पार्श्वभूमीवर आणि शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने खासदार संजय जाधव यांच्या नेतृत्वात तालुक्यातील सिंगणापूर फाटा येथे सोमवारी (दि. २३) रास्ता रोको करण्यात आले होते. सोमवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास सिंगणापूर फाटा येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे, प्रसाद गोरे, गणेशराव घाडगे, काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, पांडुरंग खिल्लारे, गंगाप्रसाद आणेराव, ॲड. माधुरी क्षीरसागर, आत्माराम वाघ, पंढरीनाथ घुले, बंडू आव्हाड, पप्पू वाघ, मुंजा कुकर, जनशक्ती प्रहार पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधणे आदींसह इतर दहा ते पंधरा शेतकरी आंदोलकांनी एकच जिद्द - शक्तीपीठ रद्द आणि महाराष्ट्र शासनाविरुद्ध घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी यांच्या जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिस अंमलदार अमोल डुबे यांच्या फिर्यादीवरून दैठणा पोलिसांत मंगळवारी (दि. २४) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार बळीराम मुंढे हे करीत आहेत.

## सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सचिन वाकडे यांची निवड : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव

**परभणी/प्रतिनिधी - :** सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सचिन वाकडे यांची निवड : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव करण्यात येणार आहे.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सचिन भुजंगराव वाकडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

बुधवार २५ फेबुवारी रोजी गौतम नगर येथील बुद्ध विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरवादी चळवळीच्या ज्येष्ठ नेत्या आशाताई मालसमींदर यांची निवड करण्यात आली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीला प्रारंभ झाला. उमेश लहाने यांनी अध्यक्षपदासाठी सचिन वाकडे यांचे नाव सुचविले. त्यावेळी नगरसेवक आकाश लहाने यांच्यासह आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ नेते सिद्धार्थ भराडे, सखाराम टेकुळे, चंद्रकांत लहाने, रंजीत मकरंद, रतन भराडे, भिमराव लहाने, राहुल भराडे, प्रदीप वावळे, सुधीर कांबळे यांच्यासह



उपस्थित सर्वांनी वाकडे यांच्या नावास एकमताने अनुमोदन दिले. यावेळी सर्वानुमते वाकडे यांची सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

यावेळी धिरज कांबळे, ललित कांबळे, संदीप लहाने, अमोल गायकवाड, विजयानंद झोडपे, संजय लहाने, तुकाराम मुंढे, सचिन पाचपुंजे, संघपाल लोखंडे, रोहित कांबळे, नीलेश गायकवाड, विशाल लहाने, विकास मालसमीनदर, संजय मकरंद, दिलीप वाकडे, प्रमोद राक्षे, सुमेध लहाने, राहुल मकरंद, शशी लहाने, विनय लहाने, रोहन कांबळे, कपिल मकरंद, अक्षय टेकुळे, अविनाश लहाने, बाबलेश कासारे, राज टेकुळे, नितीन साळवे, मुकेश लहाने, अमर ढाले, सवी मकरंद, सागर मुंढे, सुनील पाचपुंजे, भैय्या पगारे, राहुल ढाले, लखन भांगे, रोहन जल्लारे, संदीप कनकुटे, रामेश्वर खंदारे, श्याम लहाने, राहुल पाईकराव, धम्मपाल मकरंद, अभिजीत कांबळे, वरुण झोडपे, अजिंक्य लहाने, प्रथम भराडे, बिंगो लहाने, सागर लहाने, विकास ससाने, गौरव भराडे, पप्पू भराडे, संकेत लहाने, समयक मकरंद, गुड्डू गायकवाड, बालाजी चेरेकर, बुद्धपाल लोखंडे, विजय भराडे, अक्षय भराडे, रवी लहाने, संकेत लहाने, अजय लहाने आदींसह तरुण मित्र मंडळ व श्रावस्ती महिला मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, सचिन वाकडे यांनी निवडीनंतर सर्वांचे आभार मानत जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व समाजबांधवांनी एकत्र येऊन कार्य करावे, असे आवाहन केले. गौतम नगर परिसरात जयंती उत्सव उत्साहात आणि ऐक्याच्या वातावरणात पार पडावा, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असेही त्यांनी नमूद केले.

## सावरकरांच्या विचारांतून राष्ट्रभक्तीची जाज्वल्य प्रेरणा मिळते सुनील रामपुरकर : मराठवाडा हायस्कूलमध्ये अभिवादन कार्यक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :-** सावरकरांच्या विचारांतून राष्ट्रभक्तीची जाज्वल्य प्रेरणा मिळते असे प्रतिपादन सुनील रामपुरकर : मराठवाडा हायस्कूलमध्ये अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी केले होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे प्रभावी साहित्यिक आणि दूरदृष्टीचे विचारवंत होते. त्यांच्या लेखनातून व कृतीतून राष्ट्रभक्तीची जाज्वल्य प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन सहपर्यवेक्षक सुनील रामपुरकर यांनी केले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या ५९ व्या पुण्यतिथीनिमित्त नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूलमध्ये गुरुवार २६ फेब्रुवारी रोजी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सेमी इंग्रजी विभागाचे पर्यवेक्षक सूर्यकांत पाटील, सहपर्यवेक्षक नंदकुमार साळवे, विद्यार्थी संसद सल्लागार श्रीपाद कुलकर्णी, शिवप्रसाद कोरे, अभिजित कुलकर्णी, सागर सूडके आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या प्रारंभी सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी प्रमुख वक्ते सहपर्यवेक्षक रामपुरकर यांनी सावरकरांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेतला. आपल्या भाषणात त्यांनी सावरकरांना प्रखर राष्ट्रभक्त, थोर क्रांतिकारक, समाजसुधारक व हिंदुत्ववादी विचारवंत म्हणून गौरविले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी सहन केलेल्या हालअपेष्टा व बलिदानाचा उल्लेख करताना अंदमानातील सेल्युलर कारागृहातील कठोर शिक्षेचा संदर्भ देत विद्यार्थ्यांना राष्ट्रनिष्ठा, धैर्य आणि कर्तव्यपरायणतेचा संदेश दिला. सावरकरांचा 'राष्ट्रप्रथम' हा विचार आजच्या तरुणाईसाठी दीपस्तंभ आहे. सामाजिक समता, विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन आणि संघटित समाजरचनेचा संदेश देणारे सावरकर हे केवळ स्वातंत्र्यसैनिक नव्हते, तर प्रभावी साहित्यिक आणि दूरदृष्टीचे विचारवंत होते. त्यांच्या लेखनातून व कृतीतून राष्ट्रभक्तीची जाज्वल्य प्रेरणा मिळते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीपाद कुलकर्णी यांनी केले. आभार कोरे यांनी मानले. उपस्थितांचे आभार मानत त्यांनी सावरकरांच्या विचारांचे आचरण जीवनात करण्याचे आवाहन केले. देशभक्तीची जाज्वल्य भावना जागृत करणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. यावेळी मान्यवर, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यामंदिर सायाळाचे एनएमएमएस परीक्षेत यश; १६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

परभणी,/प्रतिनिधी: राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या एनएमएमएस इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यामंदिर सायाळाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. २८ डिसेंबर रोजी झालेल्या या परीक्षेत विद्यालयातील २४ नियमित विद्यार्थ्यांपैकी तब्बल १६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले.

यामध्ये कु. दिव्या माधव खटिंग (१४१), कु. अंकिता किशन खटिंग (१०९), चि. शंतनु मोतीराम वैद्य (१०७), कु. गायत्री ज्ञानोबा खटिंग (१०३), कु. हर्षदा कोंडीबा वाघ (१०१), चि. ओंकार भरत तारे (९०), चि. समर्थ उत्तमराव पारवे (८९), कु. गौरी लक्ष्मण वाघ (८७), कु. गंगासागर पांडुरंग शिंदे (८१), कु. समृद्धी अर्जुन शिंदे (७९), चि. संभव मरीबा ढेरे (७८), कु. कांचन परमेश्वर काळे (७७), कु. राधा गणेश बोबडे (७५), चि. वैभव विठ्ठल काळे (७५), चि. गणेश जय सरोदे (७४) आणि कु. ज्ञानेश्वरी अंबादास शिंदे (७२) यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना विभागप्रमुख पंडगू, मार्गदर्शक पामे तसेच विषय शिक्षक आंबेकर, सौ. जोशी, राठोड, सौ. सूर्यवंशी, सौ. पांढरे व देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशालेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## परभणीतील १९८६-८७ पोलीस भरती बॅचचा 'स्मृतिगंध मैत्री' स्नेहमेळावा उत्साहात

**परभणी ,/प्रतिनिधी:** सन १९८६-८७ मध्ये परभणी येथे झालेल्या पोलीस भरतीत दाखल झालेल्या प्रशिक्षणार्थी बॅचमधील सर्व ५० सेवानिवृत्त पोलीस बांधवांनी एकत्र येत 'स्मृतिगंध मैत्री'चा स्नेहमेळावा मंगळवार २४ फेब्रुवारी रोजी पाथरी रोडवरील सरदेशपांडे हुरडा पार्टी परिसरात जल्लोषात साजरा केला. अनेक वर्षांनंतर प्रथमच एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा हा ऐतिहासिक सोहळा ठरला.

शालेय जीवनानंतर मित्र एकत्र येतात, असे आपण ऐकतो; मात्र पोलीस सेवेत भरती झाल्यानंतर तब्बल चार दशकांनंतर अशा पद्धतीने राज्यात प्रथमच पोलीस बांधवांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास सन १९८६-८७ दरम्यान परभणी येथे पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेले तसेच सेवानिवृत्त अप्पर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र, मुंबई खंडेराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक माधव लोकुरवार होते. विशेष अतिथी म्हणून सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक गोपीनाथ सरोदे, सेवानिवृत्त राखीव पोलीस दल निरीक्षक गंगाधर टाकरज, सेवानिवृत्त राखीव पोलीस उपाधीक्षक सय्यद मुसा, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक तथा सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि या सोहळ्याचे आयोजक शिवाजीराव कोटे, तसेच संघटनेचे जिल्हा सचिव व मुख्य समन्वयक जळबाजी गायकवाड उपस्थित होते.

प्रमुख अतिथींचे आगमन होताच ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी १९८६-८७ च्या भरती बॅचमधील दिवंगत सहकाऱ्यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर दीपप्रज्वलन करून स्नेहमेळाव्याचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. मुख्य अतिथी खंडेराव शिंदे यांचा सपत्नीक शाल, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच इतर मान्यवरांचाही सत्कार करण्यात आला.

आयोजक शिवाजीराव कोटे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, पोलीस सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या सर्व मित्रांना पुन्हा एकत्र आणून आनंदोत्सव साजरा करणे हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश आहे. खंडेराव शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही भरती झालो. त्यांच्या पारदर्शक भरती प्रक्रियेमुळे सर्वसामान्य कुटुंबातील आम्हाला पोलीस दलात काम करण्याची संधी मिळाली. साहेबांनी आमचे निमंत्रण स्वीकारून मुंबईहून येत आम्हाला आशीर्वाद दिले, हे आमचे भाग्य आहे.

उपस्थित सेवानिवृत्त पोलीस बांधवांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, खंडेराव शिंदे साहेबांमुळेच आम्हाला पोलीस सेवेत प्रवेश मिळाला. त्यांच्या प्रामाणिक व पारदर्शक कार्यपद्धतीमुळे आम्ही विविध पदांपर्यंत पोहोचू शकलो. सर्वांनी कृतज्ञता व्यक्त केली. खंडेराव शिंदे यांनी आपल्या भाषणात भावूक होत सांगितले की, माझ्या कार्यकाळात अनेक भरती झाल्या; परंतु इतक्या वर्षांनंतर अशा प्रकारे सन्मानपूर्वक बोलावून सत्कार करण्यात येईल, याची अपेक्षा नव्हती. चांगल्या कामाचे कौतुक उशिरा का होईना होतेच. सेवानिवृत्तीनंतर सर्वांनी आरोग्याची काळजी घ्यावी आणि मैत्रीचे ऋणानुबंध जपावेत. त्यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले. संघटनेचे सचिव जळबाजी गायकवाड यांनी पोलीस कर्मचारी संघटनांच्या मर्यादा व अडचणींचा उल्लेख करत, सेवानिवृत्त पोलीस संघटनेच्या माध्यमातून बांधवांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

## अग्रलेख...

# एकेकाळच्या 'मुक्तिदात्यां'चा शक्तिपात

१९९१मध्ये नक्षलवाद्यांनी महाराष्ट्राचे तत्कालीन मंत्री आणि अहेरीचे राजे धर्मरावबाबा आत्राम यांचे अपहरण केले होते. या योजनेचा मुख्य सूत्रधार तिप्पिरी तिरुपती उर्फ देवजी हा होता. बाबा आत्रामांना ओलिस ठेवून त्याने आपल्या काही सहकाऱ्यांची सुटका करून घेतली. या घटनेमुळे नक्षल चळवळीत देवजीचा नावलौकिक झाला. आठ महिन्यांपूर्वी बसव राजू मारला गेल्यानंतर देवजीकडे या चळवळीच्या प्रमुख पदाची सूत्रे आली होती. पण परवा अचानक त्याने तेलंगणा पोलिसांसमोर शरणागती पत्करल्याचे समोर आले. तब्बल १ कोटी ३० लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या या सर्वोच्च नेत्याचे समर्पण नक्षल चळवळीसाठी मोठाच धक्का आहे. किंबहुना, ही चळवळच आता पूर्णपणे नेतृत्वहीन झाली आहे. देवजीची शरणागती हा कदाचित त्यातील शेवटचा टप्पा असेल.

देवजीचा जन्म तेलंगणा राज्यातील निर्मल जिल्ह्यातल्या लक्ष्मणचांदा येथील गरीब शेतकरी कुटुंबातला. शालेय शिक्षण स्थानिक पातळीवर पूर्ण करून तो औद्योगिक प्रशिक्षणासाठी कोठागुडम येथे आला. याच काळात तो डाव्या विचारसरणीच्या संपर्कात आला. विद्यार्थी असतानाच तो १९८० च्या दशकात राजकारणात सक्रिय झाला होता. 'रॅडिकल स्टुडंट्स युनियन'मध्ये असताना त्याचे वैचारिक परिवर्तन झाले आणि नंतर तो 'पीपल्स वॉर ग्रुप'मध्ये (आताची भाकप माओवादी) सामील झाला. अवघ्या काही वर्षांत त्याने गनिमी काव्यात प्रावीण्य मिळविले. देवजी नक्षलवाद्यांच्या लष्करी विभागाचा मुख्य रणनीतिकार मानला जात होता. चळवळीचे सर्वोच्च निर्णय घेणाऱ्या 'सेंट्रल कमिटी'चाही तो सदस्य होता. महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील नक्षल हालचालींचे त्याने दीर्घकाळ नेतृत्व केले. छत्तीसगडमधील बस्तर आणि सुकमा भागात अनेक मोठ्या हल्ल्यांचे नियोजन त्याचेच होते. नवीन शस्त्रे आणि स्फोटकांच्या वापराबाबत तो तज्ज्ञ मानला जायचा. २१ मे २०२५ रोजी छत्तीसगडच्या बस्तर भागात माओवाद्यांचा तत्कालीन सर्वोच्च नेता बसव राजू याच्यासह २७ माओवाद्यांचा खात्मा केला गेला. परिणाम म्हणून ६ जूनला १२ माओवाद्यांनी गडचिरोली येथे आत्मसमर्पण केले. लगेच १८ जूनला आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यातल्या चकमकीत माओवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य गजरला रवी ठार झाला. धास्तावलेला केंद्रीय समिती सदस्य भूपतीने ३ ऑक्टोबरला सशस्त्र लढा थांबविण्याची भूमिका जाहीर केली. पुढे त्याने १५ ऑक्टोबरला ६१ माओवाद्यांसह आत्मसमर्पण केले. १८ नोव्हेंबर २०२५ ला अत्यंत जहाल माओवादी माडवी हिडमा यास केंद्रीय सुरक्षा रक्षकांनी यमसदनी धाडले. त्या चकमकीत हिडमाची पत्नी राजक्का हिच्यासह अन्य सहा नक्षलवादीही ठार झालेत. नजीकच्या काळातील या दमदार कारवाया नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडण्यास पुरेशा होत्या. आता देवजीची शरणागती माओवादी चळवळीला लागलेली घरघर थांबली असल्याचेच संकेत देणारी आहे.

सुरक्षा रक्षकांकडे देवजीचे जुने ठेवणीतलेच छायाचित्र असल्याने देवजी अजूनही दिसायला तरुण वाटायचा. खरे तर तो थकलेला होता. त्याचे ढासळते आरोग्य आणि चळवळीतील सुरक्षा रक्षकांची पसरलेली दहशत हे त्याच्या शरणागतीचे कारण मानले जात आहे. दीर्घकाळ जंगलात राहिल्यामुळे त्याला सांधेदुखी आणि इतर शारीरिक व्याधींनी ग्रासले होते. शिवाय नक्षल चळवळीतील नेत्यांमधील अंतर्गत मतभेदही नजीकच्या काळात उफाळून आले आहेत. देवजीच्या शरणागतीने नक्षल चळवळ पुन्हा एकदा नेतृत्वहीन झाली असून केंद्र आणि राज्य सरकारच्या नक्षलविरोधी मोहिमेचे हे मोठे यश मानले जात आहे तर दुसरीकडे माओवाद्यांच्या या शक्तिपातामुळे नव्याने उभारी घेण्याची शक्यताही मावळली आहे. एक काळ असा होता की, या चळवळीने अंतर्गत सुरक्षेसमोर सर्वात मोठे आव्हान उभे केले होते. या नक्षलवादाची मुळे पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील नक्षलबारी या लहानशा गावात रुजली. चारू मुजुमदार, कानु सन्याल आणि जंगल संताल यांच्या नेतृत्वाखाली शेतमजुरांनी जमीनदारांविरुद्ध पुकारलेला तो सशस्त्र उठाव होता. पाहता-पाहता 'कसणाऱ्याची जमीन' या घोषणेची ठिणगी १० पेक्षा जास्त राज्यांत पसरली. छत्तीसगड राज्यातील बस्तर, दंतेवाडा येथील भौगोलिक दुर्गमता आणि घनदाट जंगलांमुळे ते नक्षलवाद्यांचे मुख्य केंद्र बनले. खनिज संपत्तीने समृद्ध असूनही झारखंड आणि बिहारमधील गरिबीमुळे माओवादी विचारांना खतपाणी मिळाले. आंध्र प्रदेशाला लागून असलेल्या महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदियासारख्या सीमावर्ती भागांत नक्षलवाद्यांनी आपले जाळे विणले. ओडिशा, आंध्र प्रदेश आणि तेलंगणात ही चळवळ अतिशय तीव्र होती. आदिवासींच्या संसाधनांवर बाहेरील लोकांचे आक्रमण, दुर्गम भागात रस्ते, दवाखाने आणि शाळांची अनुपस्थिती, सावकार आणि जमीनदारांकडून होणारी पिळवणूक ही पृष्ठभूमी माओवादी विचारांना मोठे करीत राहिली. सुरुवातीला आदिवासींनी नक्षलवाद्यांना मुक्तिदाता मानले. कारण त्यांनी तेंदूपत्ता संकलनाचे दर वाढवून दिले. पण या फुटकळ प्रयत्नांनी असमानता व विषमता दूर होईल, हा भ्रम लवकरच दूर झाला. कारण विकासाच्या पर्यायी संकल्पना हे नक्षलवादी रुजवू शकले नाहीत. उलट त्यांनी रस्त्यांना, टेलिफोनचे जाळे विणण्यास, पूल बांधकामास विरोध केला. ज्यांच्या भरवशावर ते जंगलात राहत होते त्याच आदिवासींना पोलिसांचे खबरी म्हणून ठार मारण्यास सुरुवात केली. शाळा जाळणे आणि कंत्राटदारांकडून मोठ्या प्रमाणावर खंडणी उकळल्यामुळे स्थानिकांनाही नक्षल्यांची भीती वाटू लागली. नाही म्हणायला, आदिवासींचे उत्पन्न वाढविण्याचे थोडेफार काम त्यांनी केले, पण त्याचाही वाटा मागण्याचा वाहियातपणा या माओवाद्यांनी दाखवला.

दुसरीकडे, सुरुवातीला पोलिसांनी नक्षलवाद्यांना संपवण्यासाठी बळाचा वापर केला होता. त्यात स्थानिक आदिवासींचेही नुकसान झाले. नक्षलवादी व पोलिस यांच्यात 'इकडे आड तिकडे विहीर' अशी काहीशी स्थिती या वनवासींची झाली होती. त्यामुळे मधला काळ ही चळवळ संपण्यासाठी कठीण गेला. पण नंतरच्या काळात पोलिसांनी आपली रणनीती बदलली. आदिवासींना विश्वासात घेतले. प्रदीर्घ काळ या प्रभाव क्षेत्रावर ताबा असूनही आदिवासींमध्ये त्यांना आपला विचार पूर्णपणे रुजवता आला नव्हता. त्यामुळे या चळवळीला स्थानिक पातळीवर वैचारिक अधिष्ठान नव्हतेच. त्याचा लाभ घेत सरकार व पोलिसांनी विविध विकासात्मक योजना राबविल्या. सशस्त्र क्रांती करून आम्ही शोषणविरहित व्यवस्था उभी करू, या नक्षलवाद्यांच्या आश्वासनांवर आदिवासी जनता आणखी किती काळ विश्वास ठेवू शकली असती. तसेही सशस्त्र क्रांती कुठेही कायमस्वरूपी यशस्वी होऊ शकली नाही, हा इतिहास आहे. त्यामुळे २०१२ नंतरच्या काळात नक्षल चळवळीला उतरती कळा लागली. त्याचा सुयोग्य लाभ सरकारने घेतला. नक्षल्यांविरुद्ध विपरीत परिस्थितीतही लढणाऱ्या सुरक्षा दलांच्या धैर्याची प्रशंसा करीत, त्यांच्यात विजयाची इच्छाशक्ती कायम जागृत ठेवण्याचे काम विद्यमान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद संपवण्याची 'डेडलाईन' दिली. ती संपायच्या आतच ही चळवळ संपायच्या मार्गावर असल्याची खात्री पटते. देवजीची शरणागती ही नक्षलवादी विचारसरणीचा संपूर्ण पराभव दर्शविणारी आहे. सरकारचे मोठे यशही ती अधोरेखित करते. पण नक्षलवाद संपत असताना सरकारची भूमिका सहयोग्याची असणे गरजेचे आहे. आदिवासींच्या मनात हे सरकार आमचे आहे अशी भावना रुजली पाहिजे; जेणेकरून पुन्हा अशा चळवळी उभ्या राहणार नाहीत. शोषणमुक्त समाज ही या भागाची गरज होती आणि काही अंशी अद्यापही आहे. त्यासाठी आश्वासक योजना आखली जावी. जल, जमीन व जंगलावर मनापासून प्रेम करणाऱ्या व तीच जीवनपद्धती जगणाऱ्या या भागातील जनतेचा विकास करीत असताना पर्यावरणाला ओरबाडण्याची जाणीव त्याच्यात रुजणार नाही, याचीही दक्षता घ्यावी लागणार आहे. बाकी एकेकाळच्या मुक्तिदात्यांचा शक्तिपात आदिवासींना, शासन-प्रशासन व पोलिसांना तसेच समस्त भारतातील नागरिकांना सुखावणाराच आहे, यात वाद नाही.


## स्मरण

**डॉ. प्रीती पोहेकर**

# सावरकरांच्या विचारांचे सार शोधताना...

इतिहासातील व्यक्तिमत्त्वांचे मूल्यमापन करताना दोन टोकांपासून जपून राहावे लागते. अतिभक्ती आणि अतिरेकी टीका. कारण या दोन्ही टोकांमध्ये सत्य अनेकदा हरवते. विनायक दामोदर सावरकर अर्थात स्वातंत्र्यवीर सावरकर हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्याभोवती प्रशंसा आणि विवाद यांचे वलय आजही तितक्याच तीव्रतेने फिरताना दिसते. सावरकरांकडे केवळ भावनांच्या किंवा राजकीय पूर्वग्रहांच्या चष्म्यातून पाहण्याऐवजी इतिहासाच्या संदर्भात त्यांच्या लेखनाच्या आणि कृतीच्या आधारे चिकित्सक नजरेने पाहणे आवश्यक ठरते. सावरकर हे केवळ स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक नव्हते; ते समाजरचनाविषयक चिंतक, तर्कनिष्ठ सुधारक आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाची संकल्पना मांडणारे विचारवंत होते. त्यांच्या जीवनातील अंदमानातील कठोर शिक्षा, रत्नागिरीतील स्थानबद्धतेचा काळ, जातिनिर्मूलनासाठी केलेले प्रयोग आणि अखंड राष्ट्राच्या संकल्पनेविषयीची त्यांची तळमळ या सर्वांचा एकत्रित विचार केल्याशिवाय त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व समजणे कठीण आहे. सावरकरांच्या दृष्टीने 'धर्म' ही संकल्पना संकुचित नव्हती. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन अशा पंथनिहाय विभागणीत ते धर्म पाहत नसत. सावरकरांचा दृष्टिकोन याच संकल्पनेशी साधर्म्य राखतो. त्यांच्या मते, या भूमीत राहणारा प्रत्येक जण सांस्कृतिक अर्थाने 'हिंदू' आहे. 'हिंदू' हा शब्द कोणत्याही पंथाचा द्योतक नसून सिंधू संस्कृतीपासून अपभ्रंश होत निर्माण झालेली एक भौगोलिक आणि सांस्कृतिक ओळख आहे. त्यामुळे 'हिंदुत्व' हे त्यांच्यासाठी धर्मसंकल्पना नसून सांस्कृतिक राष्ट्रत्वाचे प्रतीक होते. अंदमानमधील सेल्युलर तुरुंगातून झालेल्या त्यांच्या सुटकेविषयी समाजात आजही वाद आहेत. आयुष्यभर तुरुंगात खितपत पडून काही साध्य होणार नाही, हे त्यांना उमगले होते. देशासाठी कार्य करण्याचे मार्ग केवळ राजकारणापुरते मर्यादित नसतात, तर समाजकारणही तेवढेच प्रभावी असावे लागते, हा त्यांचा विश्वास होता.

१९२४ मध्ये सेल्युलर कारागृहातून मुक्तता झाल्यानंतर त्यांना रत्नागिरी येथे स्थानबद्ध करण्यात आले होते. राजकीय कार्यावर निर्बंध होते. सार्वजनिक राजकीय भाषणांवर मर्यादा होत्या. परंतु या बंधनांमधूनही त्यांनी राष्ट्रनिर्मितीचा मार्ग शोधला आणि तो मार्ग होता समाजसुधारणेचा. रत्नागिरीत त्यांनी सर्वप्रथम हात घातला तो जातिभेदाच्या प्रश्नाला. दलित वस्त्यांमध्ये जाऊन सहभोजन करणे, त्यांना आपल्या घरी आमंत्रित करणे, आपल्या घरात-अगदी स्वयंपाकघरातही प्रवेश देणे, सार्वजनिक विहिरी, मंदिरे आणि सामाजिक स्थळे सर्वांसाठी खुली व्हावीत यासाठी प्रचार करणे या कृती त्या काळात धाडसी मानल्या जात. त्या काळातील सामाजिक परिस्थितीत ही कृती क्रांतिकारीच होती. त्यामुळे त्यांना केवळ परंपरावाद्यांकडून नव्हे, तर स्वतःच्या समाजातूनही विरोध पत्करावा लागला. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वात एक विलक्षण सुसंगती दिसते. ते जसे बोलत तसेच जगत. विचार आणि आचरण यांच्यातील दरी त्यांनी



जाणीवपूर्वक नाकारली होती. त्यांच्या रत्नागिरीतील स्थानबद्धतेचा काळ हा याच सुसंगतीचा प्रत्यय देणारा ठरतो. सावरकर केवळ दलित समाजाबरोबरच नव्हे, तर मुस्लिम आणि ख्रिश्चन बांधवांबरोबरही सहभोजन करत. त्या काळात सहभोजन हा सामाजिक क्रांतीचा प्रत्यक्ष प्रयोग होता. मांडीला मांडी लावून बसणे, एकत्र बसून जेवणे या कृती म्हणजे त्या समाजमान्यतेच्या भिंतींना दिलेले उघड आव्हान होते. स्पृश्य-अस्पृश्यतेच्या, पंथभेदांच्या कोंडमाऱ्यात अडकलेल्या समाजाच्या दृष्टीने हे पाऊल धाडसीच नव्हे, तर परंपरावाद्यांना अस्वस्थ करणारे होते.

या कृतीमुळे पारंपरिक रूढी आणि रिवाजांना घट्ट धरून बसणाऱ्या भारतीय समाजात खळबळ उडालीच; परंतु काही मुस्लिम आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांमध्येही एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली होती, असेही म्हटले जाई. कारण त्या काळात 'सहभोजन' धार्मिक सीमारेषांशी जोडले गेले होते. रत्नागिरीतील सहभोजनांच्या पंक्ती केवळ जेवणाच्या नव्हत्या. त्या सामाजिक क्रांतीच्या पंक्ती होत्या. त्या पंक्तीत बसताना सावरकर केवळ समाजसुधारकाची भूमिका बजावत नव्हते, तर 'मानव' या समान ओळखीचा पुरस्कार करीत होते. राष्ट्र उभे राहते ते समानतेच्या पायावर, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. अन्न, पाणी आणि स्पर्श यांच्या भिंती पाडल्याशिवाय मनाची दारे उघडत नाहीत, हे त्यांना ठाऊक होते.

रत्नागिरीतील पतितपावन मंदिर ही त्यांच्या सामाजिक क्रांतीची साक्ष देणारी घटना ठरली. सर्व हिंदूंसाठी जातिभेदाशिवाय प्रवेश असलेले मंदिर उभारण्यात त्यांनी पुढाकार घेतला. मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून सामाजिक समानतेचे प्रतीक असावे, हा त्यामागचा संदेश होता. या उपक्रमामुळे त्यांना पारंपरिक समाजरचनेतील घटकांकडून विरोधही सहन करावा लागला. कर्मकांड, अंधश्रद्धा, स्पृश्य-अस्पृश्यता, सोवळे-ओवळे यासारख्या प्रथांना त्यांनी उघडपणे विरोध केला. बुद्धिनिष्ठ, विज्ञानाभिमुख आणि पुरोगामी दृष्टिकोन हा त्यांच्या विचारांचा पाया होता. बुद्धीला न पटणारी आणि तर्कसंगती नसणारी कोणतीही गोष्ट अथवा कृती केवळ पूर्वीपासून चालत आली आहे, म्हणून आचरणात आणू नये असा त्यांचा आग्रह होता. अखंड हिंदुस्थान हे त्यांचे स्वप्न होते. फाळणीच्या प्रश्नावर त्यांची भूमिका ठाम होती. भारत अखंड राहावा ही त्यांची इच्छा होती. देशाचे विभाजन ही एक ऐतिहासिक शोकांतिका आहे असे ते मानत. सावरकरांच्या विचारांशी मतभेद व्यक्त केले गेले. त्यांच्या कृतींवर टीकाही झाली. परंतु त्या टीकेमुळेच त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास झाला. त्यांच्या साहित्याचा पुनर्विचार झाला आणि त्यांच्या कार्याचे अनेक पैलू नव्याने उजेडात आले. किंबहुना, त्यांच्यावर केलेल्या आरोपांमुळेच सावरकर पुन्हा एकदा 'जीवित' झाले, असे म्हणता येईल. असे भाग्य इतर कुणाही स्वातंत्र्यसेवकाला लाभले नाही.

सावरकरांच्या साहित्याची उंची सामान्यांना न पेलणारी आहे. अंदमानानंतरच्या काळातही त्यांनी विपुल लेखन केले. इतिहास, राजकारण, समाजशास्त्र, काव्य अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी विचार मांडले. त्यांची लेखनशैली तर्कशुद्ध, प्रखर आणि आक्रमक होती. त्यांनी रचलेली देशभक्तीपर गीते, नाटके आणि लेख यातून त्यांच्या मनातील राष्ट्रनिष्ठा व्यक्त होते. त्यांचे प्रभावी वक्तृत्व आणि जहाल लेखन यांचा ब्रिटिशांनी धसका घेतला होता, असे मानायला जागा आहे. भाषिक स्वाभिमान हा त्यांच्या राष्ट्रवादाचा अविभाज्य भाग होता. इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द देऊन त्यांनी भाषा समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रनिर्मितीतील भाषेचे महत्त्व ते जाणून होते. त्यांच्या मते, भाषिक गुलामगिरी ही मानसिक गुलामगिरीचीच एक छटा आहे. सावरकरांच्या विचारांचे मूल्यांकन करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ते मूलतः संघटनवादी होते. समाजाची ऊर्जा विखुरलेली न राहता एकत्र यावी, यासाठी त्यांची धडपड होती. त्यांना सामाजिक समता, सांस्कृतिक अभिमान आणि राजकीय सबलता ही त्रिसूत्री मान्य होती. विखुरलेला समाज कधीच सबळ राष्ट्र उभारू शकत नाही, हे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यामुळे त्यांनी सामाजिक आत्मभान यावे म्हणून 'हिंदू संघटन' ही संकल्पना मांडली. राष्ट्रनिर्मितीत स्त्रियांचा सक्रिय सहभाग अपरिहार्य आहे, हा त्यांचा आग्रह त्या काळाच्या तुलनेत प्रगत मानला जातो.

सावरकरांचा खरा वारसा समाजाला अंतर्मुख करणाऱ्या या मुद्द्यांमध्ये आहे. त्यांनी पेटवलेली विचारांची आणि कृतीची ज्योत केवळ इतिहासाच्या पानांवर नाही. ती विवेक, संघटन आणि आत्मभान यांची आठवण करून देणारी चेतना आहे. त्यांच्या जीवनातील सत्य पुराव्यांवर उभे राहावे. त्यांच्या कार्याची व्यापकता समजून घ्यावी आणि मतभेदांच्या पलीकडे जाऊन त्यांच्या विचारांचे सार शोधावे हीच त्यांना दिलेली खरी आदरांजली ठरेल.

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# 'मिशन जिंकूया'मुळे विद्यार्थ्यांना नवी दिशा

गडचिरोली म्हटलं की डोळ्यासमोर येतं घनदाट जंगलं, नद्या-नाले, डोंगररांगा आणि अनेक अडचणींशी झुंज देणारे जीवन. या दुर्गमतेच्या पलीकडे आज गडचिरोलीतील विद्यार्थी मोठी स्वप्ने पाहू लागला आहे. स्पर्धेच्या युगात तो आत्मविश्वासाने पुढे जात आहे आणि त्याच्या पाठीशी आहे जिल्हा प्रशासन. जिल्हा परिषद गडचिरोलीच्या 'मिशन जिंकूया' या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे ग्रामीण व अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडू लागले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणारा हा उपक्रम केवळ शिष्यवृत्ती परीक्षेपुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. तज्ज्ञ मार्गदर्शन, ओएमआर सराव, परीक्षा शुल्काची सुविधा, शिक्षकांसाठी उद्बोधन वर्ग आणि अभ्यासाचे सूक्ष्म नियोजन अशा विविध माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा दिली जात आहे.

अलिकडेच शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेल्या २० विद्यार्थ्यांना मुंबईची हवाई सफर घडवून आणण्यात आली. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या या विद्यार्थ्यांनी प्रथमच विमान प्रवासाचा अनुभव घेतला. मंत्रालय, विधान भवन, गेटवे ऑफ इंडिया, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, एलिफंटा लेणी, नेहरू विज्ञान केंद्र आणि नेहरू तारांगण अशा ऐतिहासिक व शैक्षणिक स्थळांना भेट देत ज्ञानाचा आणि अनुभवाचा नवा खजिना उघडला. ही सहल त्यांच्या स्वप्नांना आकाशाची उंची देणारा अनुभव होता. या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे मुख्य सचिव तथा गडचिरोलीचे पालक सचिव राजेश अग्रवाल यांच्या निवासस्थानी भेट दिली. गडचिरोलीतील विद्यार्थी अत्यंत तेजस्वी आहेत, असे सांगत त्यांनी त्यांच्या जिद्दीचे कौतुक केले. शिक्षक, डॉक्टर, कलेक्टर किंवा पोलिस अधिकारी होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या या मुलांना सर्वोत्तम सुविधा मिळाल्या पाहिजेत, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मोठ्या स्वप्नांना शासनाने दिलेली ही दाद त्यांच्या आत्मविश्वासाला नवे बळ देणारी आहे. खरे पाहता, ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिमत्तेची कमी नाही; कमी आहे ती संधींची. 'मिशन जिंकूया'सारख्या उपक्रमांमुळे ही दरी भरून काढण्याचा प्रयत्न होत आहे. विद्यार्थ्यांना जर योग्य मार्गदर्शन, उत्तम शिक्षक आणि आधुनिक सुविधा मिळाल्या, तर ते कोणत्याही क्षेत्रात मागे राहणार नाहीत. उलट, कठीण परिस्थितीत वाढल्यामुळे त्यांच्यातील जिद्द आणि चिकाटी त्यांना अधिक सक्षम बनवते. पुढील वर्षी शंभर विद्यार्थ्यांना हवाई सफर घडविण्याचा आणि 'आदर्श शाळां'तर्गत विद्यार्थ्यांना हैदराबाद व बंगळुरू येथील रिसर्च सेंटरला पाठविण्याचा मानस प्रशासनाने व्यक्त केला आहे. हा केवळ दौरा नाही, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवरील संधींचे दार उघडण्याचा प्रयत्न आहे. अशा एक्सपोजरमुळे विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाचा विस्तार होतो, त्यांची स्वप्ने अधिक स्पष्ट होतात आणि स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्यासाठी नवा उत्साह निर्माण होतो. आज गरज आहे ती या सकारात्मक उपक्रमांना सातत्य देण्याची. जिल्हा प्रशासनाने दाखवलेली दूरदृष्टी आणि बांधिलकी नक्कीच कौतुकास्पद आहे. गडचिरोलीसारख्या अतिदुर्गम जिल्ह्यातूनही विद्यार्थी मोठी स्वप्ने पाहू शकतो, ती पूर्ण करू शकतो, यावर 'मिशन जिंकूया'ने शिक्कामोर्तब केले आहे. दुर्गमतेतून उंच भरारी घेणाऱ्या या विद्यार्थ्यांना सलाम! योग्य संधी आणि भक्कम पाठबळ मिळाले, तर गडचिरोलीचा विद्यार्थी केवळ जिल्ह्याचाच नव्हे तर राज्य आणि देशाचाही अभिमान ठरेल, याबद्दल शंका नाही.

आजच्या काळात स्पर्धा तीव्र आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी आत्मविश्वास, योग्य दिशा आणि सातत्यपूर्ण परिश्रम आवश्यक असतात. 'मिशन जिंकूया' विद्यार्थ्यांना केवळ यशाचे ध्येय देत नाही, तर त्यासाठी लागणारी मानसिक ताकदही देतो. गडचिरोलीच्या मातीतील ही मुले जर अशाच पद्धतीने संधींचा लाभ घेत राहिली, तर उद्याचे डॉक्टर, अभियंते, प्रशासकीय अधिकारी आणि वैज्ञानिक याच दुर्गम भागातून घडतील, अशी आशा बाळगू शकतो. गडचिरोलीच्या दुर्गम मातीत उमलणारी ही स्वप्ने आता केवळ कल्पना राहिलेली नाहीत, तर ती वास्तवात उतरण्याच्या दिशेने ठाम पावले टाकत आहेत. प्रशासनाची साथ, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची जिद्द यांचा संगम झाला, तर कोणतीही दुर्गमता आड येऊ शकत नाही. 'मिशन जिंकूया'सारखे उपक्रम ही केवळ योजना नसून ग्रामीण भागातील नव्या पिढीच्या भविष्याची भक्कम पायाभरणी आहे. ही जिद्द, हा आत्मविश्वास आणि हे पाठबळ कायम राहिले, तर गडचिरोलीचा विद्यार्थी उद्याच्या भारताच्या घडणीत निर्णायक भूमिका बजावेल, यात तिळमात्र शंका नाही.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# हरयाणात काँग्रेसला क्रॉस व्होटिंगचा शाप

राज्यसभेच्या एकूण ७२ जागांसाठी यावर्षी तीन टप्प्यात निवडणूक होणार आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात ३७ जागांची निवडणूक १६ मार्चला होत आहे. जूनमध्ये २४ तर नोव्हेंबर महिन्यात ११ अशा आणखी ३५ जागांसाठी निवडणूक होणार आहे. पहिल्या टप्प्यात निवडणूक होत असलेल्या राज्यसभेच्या ३७ जागांत काँग्रेस नेतृत्वातील इंडिया आघाडीजवळ १८ तर भाजपा नेतृत्वातील रालोआजवळ १५ जागा आहेत. रालोआच्या १५ जागात भाजपाच्या ९ जागांचा समावेश आहे. यावेळी भाजपाच्या जागांत तीनने वाढ होत त्या १२ होऊ शकतात. दुसरीकडे इंडिया आघाडीच्या १८ जागात काँग्रेसच्या फक्त ४ जागा आहेत. त्यात फार तर एका जागेची भर पडू शकते. काँग्रेसचे अभिषेक मनू सिंघवी, केटीएस तुलसी, रजनी पाटील आणि फुलोदेवी नेताम या चार सदस्यांचा कार्यकाळ संपत आला आहे. यापैकी केटीएस तुलसी आणि फुलो देवी नेताम हे दोन सदस्य छत्तीसगडमधून निवडून आल्या आहेत. अभिषेक मनू सिंघवी तेलंगणातून तर रजनी पाटील महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवडून आल्या आहेत.

जून महिन्यात ज्या २४ जागांसाठी निवडणूक होणार आहे, त्यातही काँग्रेसच्या ४ जागा आहेत. जून महिन्यात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांचा कार्यकाळ संपत आहे. सध्या राज्यसभेत काँग्रेसचे संख्याबळ २७ आहे. यावर्षी होणाऱ्या निवडणुकीत काँग्रेसच्या जागा दोनने वाढतील, असा अंदाज आहे. मात्र, या निवडणुकीत काँग्रेसच्या जागा वाढल्या नाही तर काँग्रेसकडे असलेले राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद धोक्यात येऊ शकते. त्यामुळे काँग्रेसला यावेळी राज्यसभेची निवडणूक अतिशय गांभीर्याने लढवावी लागणार आहे. देशात सध्या फक्त तीनच राज्यात काँग्रेसची सत्ता आहे. यात तेलंगणा, कर्नाटक आणि हिमाचल प्रदेश यांचा समावेश आहे. यावेळी कर्नाटकात राज्यसभेची निवडणूक नाही, त्यामुळे काँग्रेसची सारी मदार तेलंगणा आणि हिमाचल प्रदेश या दोन राज्यांवरच राहणार आहे. छत्तीसगड आणि हरयाणाची थोडी फार मदत काँग्रेसला मिळू शकते. काँग्रेसला तेलंगणातून दोन, हरयाणा, छत्तीसगड आणि हिमाचलमधून प्रत्येकी एक जागा मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसला या निवडणुकीत खरा धोका हा भाजपापासून नाही तर आपल्याच पक्षातील आमदारांपासून आहे. त्यामुळे यावेळी निवडणुकीत आपली मते फुटणार नाही, म्हणजे क्रॉस व्होटिंग होणार नाही, याची काळजी काँग्रेसच्या नेतृत्वाला घ्यावी लागणार आहे.

याआधी झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत हरयाणा आणि हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसची मते फुटली होती. त्यामुळे सहज विजयी होणाऱ्या दोन जागांवर काँग्रेसचा पराभव झाला होता. हिमाचल प्रदेशमध्ये राज्यसभेच्या एका जागेसाठी निवडणूक होत असून राज्यात काँग्रेसचे ४० आमदार आहेत आणि राज्यसभेची एक जागा जिंकण्यासाठी ३५ मतांची आवश्यकता आहे. त्यामुळे काँग्रेसला एक जागा सहज मिळू शकते. राज्यसभेच्या एका जागेसाठी ज्येष्ठ नेते आनंद शर्मा आणि माजी प्रदेश काँग्रेस अध्यक्ष प्रतिभासिंह यांची नावे चर्चेत आहे. प्रतिभासिंह या याज्यातील ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री दिवंगत वीरभद्रसिंह यांच्या पत्नी आहेत. राज्यसभेच्या निवडणुकीचा याआधीचा राज्यातील इतिहास काँग्रेससाठी समाधानकारक नव्हता. २०२४ मध्ये राज्यात झालेल्या निवडणुकीत क्रॉस व्होटिंगचा फटका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अभिषेक मनू सिंघवी यांना बसला होता. विशेष म्हणजे तेव्हा राज्यात काँग्रेसचे स्पष्ट बहुमत होते; काँग्रेसजवळ ४० आमदार होते तर भाजपाजवळ फक्त २८. जिंकण्यासाठी ३५ आमदारांची आवश्यकता होती. त्यामुळे काँग्रेसचे अभिषेक मनू सिंघवी यांचा विजय १०० टक्के निश्चित मानला जात होता. पण मतदानात गडबड झाली, काँग्रेसच्या सहा आमदारांनी क्रॉस व्होटिंग केले, त्यामुळे काँग्रेसची सहा मते कमी होत ३४ वर आली तर भाजपाची सहा मते वाढत ती ३४ झाली. काँग्रेस आमदार काँग्रेसला साथ देत नसल्यामुळे ईश्वरानेही काँग्रेसला साथ न देण्याचा निर्णय घेतला. ईश्वरचिठ्ठीत भाजपाचे हर्ष महाजन विजयी झाले. यामुळे राज्यात प्रचंड खळबळ उडाली. काँग्रेसचे सुखवीरसिंह सुक्खू यांचे सरकार कोसळण्याची स्थिती उद्भवली होती. हिमाचल प्रदेशमध्ये पराभूत झाल्यानंतर सिंघवी नंतर तेलंगणातून राज्यसभेवर निवडून आले. २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत छत्तीसगडमधून काँग्रेसचे केटीएस तुलसी आणि फुलोदेवी नेताम हे दोन खासदार विजयी झाले होते, पण यावेळी संख्याबळाचा विचार करता काँग्रेसचा एकच खासदार विजयी होऊ शकतो. तुलसी आणि नेताम यांना काँग्रेसची उमेदवारी मिळण्याची शक्यता नाही. काँग्रेसमधून राज्यसभेच्या एका जागेसाठी माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि माजी उपमुख्यमंत्री टी.एस. सिंहदेव यांच्या नावांची चर्चा आहे. हरयाणात भाजपाच्या किरण चौधरी आणि रामचंद्र जांगरा या दोन सदस्यांचा कार्यकाळ संपत असल्यामुळे हरयाणात राज्यसभेची निवडणूक होत आहे. राज्यसभेची एक जागा जिंकण्यासाठी ३१ मतांची आवश्यकता आहे. भाजपाजवळ ४८ तर काँग्रेसजवळ ३७ आमदार आहेत. त्यामुळे भाजपा आणि काँग्रेस एकेक जागा जिंकू शकेल, असे दिसते. मात्र हरयाणात काँग्रेसमध्ये क्रॉस व्होटिंगची परंपरा आहे. २०२२ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचे अजय माकन यांचा पराभव झाला होता. भाजपा तसेच जजपाच्या पाठिंब्याने अपक्ष उमेदवार कार्तिकेय शर्मा विजयी झाले होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री भजनलाल यांचे पुत्र कुलदीप बिष्णोई यांच्या बंडखोरीमुळे तेव्हा माकन यांचा पराभव झाला होता. बिष्णोई यांना प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष व्हायचे होते; मात्र काँग्रेसच्या नेतृत्वाने माजी मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुडा यांचे निकटवर्ती उदयभान यांना प्रदेश अध्यक्ष केले, त्यामुळे दुखावलेल्या बिष्णोई यांनी क्रॉस व्होटिंग केले, असे मानले जाते.

राज्यसभा निवडणुकीत हरयाणात क्रॉस व्होटिंग होण्याची ही पहिली घटना नाही. २०१६ मध्येही क्रॉस व्होटिंगमुळे काँग्रेस आणि ईनेलो समर्थित उमेदवार आर. के. आनंद यांचा भाजपा समर्थित उमेदवार सुभाष चंद्रा यांनी पराभव केला होता. या निवडणुकीत आनंद यांना २१ तर सुभाषचंद्र यांना १५ मते मिळाली होती. काँग्रेसची १४ मते अमान्य करण्यात आली तर भाजपाची दुसऱ्या पसंतीची १४ मते चंद्रा यांना मिळाली; ते विजयी झाले होते. त्यामुळेही यावेळची हरयाणातील राज्यसभा निवडणूक काँग्रेससाठी सोपी नाही. हरयाणा काँग्रेसमध्ये गटबाजी आहे. राज्यात भूपेंद्रसिंह हुडा यांचा एक गट आहे तर दुसरा गट हुडा विरोधकांचा. हुडा विरोधकांत शैलजा, रणदीप सुर्जेवाला आणि अन्य नेत्यांचा समावेश आहे. या गटबाजीमुळे काँग्रेसला राज्यातील आपला विरोधी पक्षनेताही अजूनपर्यंत ठरवता आला नाही. या गटबाजीचा फटका राज्यातील काँग्रेसला वारंवार बसत आहे, तसाच तो यावेळीही बसण्याची शक्यता नाकारता येणार नाही. याचाच फायदा घेत भाजपाने राज्यातील राज्यसभेची दुसरी जागाही जिंकण्याचा प्रयत्न केला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

९८८१७१७८१७

### ईपीएस-९५ अंतर्गत निवृत्ती वेतनधारकांना महागाई भत्ता मिळावा

भारतात ईपीएस-९५ योजनेंतर्गत निवृत्ती वेतन धारकांची संख्या डिसेंबर २०२५ अखेर ८२.११ हजार होती. त्यात ४७ लाख कर्मचाऱ्यांना प्रति माह रु. ९ हजारांपेक्षा कमी निवृत्ती वेतन मिळत आहे. त्यात १८ लाख कर्मचारी असेही आहेत ज्यांना प्रति माह केवळ रु. १ हजार निवृत्ती वेतन मिळत आहे. यात वाढ होत नाही. कारण दर ६ महिन्यांनी जो महागाई भत्ता वाढतो, त्याचा लाभ या कर्मचाऱ्यांना मिळत नाही. सर्वोच्च न्यायालयाने ४.११.२०२२ ला दिलेल्या निर्देशानुसार काही कर्मचाऱ्यांना वाढीव पेन्शनचा लाभ मिळायला लागला आहे; पण त्यांनाही वाढीव महागाई भत्ता मिळत नाही. ईपीएस-९५ योजनेंतर्गत वाढीव महागाई भत्ता मिळण्याची तरतूद नसावी. त्यामुळे निवृत्तीच्या वेळी निर्धारित करण्यात आलेले निवृत्ती वेतन कर्मचारी हयात असेपर्यंत तेच राहत. महागाईच्या काळात प्रति माह रु. १ हजार निवृत्ती वेतन म्हणजे ज्येष्ठांची क्रूर चेष्टाच आहे. त्यातच वाढीव महागाई भत्ता न देणे अन्यायकारक आहे.

**वसंत पिंपळापुरे** /९४२२८०७०१३



### ओपन जागा की कचरा डेपो...

सोलापूर शहरात नूतन महापौर व नगरसेवक कार्यरत झालेले आहेत. प्रत्येक नूतननगरसेवक त्यांनी दिलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करत आहे. या आश्वासनात बऱ्याच नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील महत्त्वाच्या विषयावर नागरिकांशी विचारविनिमय केलेले आहे. शहरातील महत्त्वाचे प्रश्न म्हणजे पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, ड्रेनेज लाईन,लाईटीचे व्यवस्था,रस्त्यावरील अतिक्रमण,आरोग्य,हे सर्व विषय सर्व प्रभागात कायम स्वरूपी आपल्याला पाहायला मिळते याचेच एक उदाहरण म्हणजे शहरातील नावाजलेले नगर म्हणजे आंत्रोळीकर नगर व त्या शेजारी असलेले बसवेश्वर नगर हे आहे. या दोन्ही नगरात आज झपाट्याने नवीन इमारती होत आहेत. फक्त इमारती नवीन करून,बांधून फायदा नाही किंवा मनपाचे उत्पन्न टॅक्समुळे वाढते एवढेच विचार करून चालणार नाही. तर या परिसरात असलेल्या ओपन राखीव जागेवर वेळेवरच उपायोजना करून ती जागा नागरिकांसाठी वापराण्यासाठी योग्य करून देण्यात आली पाहिजे. पण तसे न होता आज या परिसरात खुली जागा म्हणजे कचरा डेपो झालेले आपल्याला पाहायला मिळते. या परिसरात असलेल्या खुल्या जागेवर जवळपासच्या बांधकामाचे कचरा येथे मोठ्या प्रमाणावर टाकण्यात येते.यामुळे या परिसरात घानीचे साम्राज्य पाहायला मिळते. पण या घाणीच्या साम्राज्याकडे प्रशासन मात्र तक्रार केल्याशिवाय उपायच करत नाही असे दिसून येते.


तरी कृपया नूतन नगरसेवकांनी आपापल्या प्रभागातील ओपन जागेवर सुंदर व उपयुक्त असे काहीतरी केले पाहिजे असे वाटते..

**फैय्याज शेख, सोलापूर**

## वाचक पत्रे

### सामाजिक समरसता

सामाजिक समरसता ही एकात्मिक राष्ट्रीय जोपासनेची गरज आहे. आपला देश भिन्न संस्कृती आणि संप्रदायाने नटलेला आहे. याकरिता परस्पर सौहार्द, सन्मान महत्त्वाचा ठरतो. देशात काही असामाजिक तत्त्व, विभक्त कुटुंब, आरक्षण,



बेरोजगारी यासारखे प्रश्न निर्माण करून उठसूट आंदोलन उभे करून देशात अशांतता माजवून लोकांना भ्रमित करतात. अलिकडे 'मुक्ती' या शब्दप्रयोगाने लोकांना भुरळ घालून रस्त्यावर कसे उतरवता येईल, याचे कसब पणाला लावण्यात धन्यता मानतात. असामाजिक तत्त्वांचा वलय निर्माण होण्याची कारणमीमांसा करण्याची गरज आता गृहमंत्रालयावर येवून पडलेली आहे. कारण कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस यंत्रणेला हे एक आव्हान आहे.

**वि. ल. उईके** /८२७५५२८०१६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# रेणापूरात अल्पभुधारक शेतकरी-महिला बचत गटाचे एकदिवशीय प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २५ फेब्रुवारी :** परिवर्तन संस्था सुमठाणा आणि जनविकास संस्था यांच्या वतीने रेणापूर तालुक्यातील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी आणि महिला बचत गटाचा एक दिवशीय मेळावा बुधवार (दि.२५) रोजी रेणापूर येथे पार पडला.

रेणापूर येथील महिला व बालविकास कार्यालयाच्या सभाग्रहात गुरुवार (दि.२५) रोजी सकाळी ११वाजता परिवर्तन संस्था आणि जनविकास संस्थेच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील मागासवर्गीय अल्पभुधारक,गायरानधारक शेतकरी व महिला बचत गटाचा एक दिवशीय मेळावा घेण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुभाष चव्हाण होते. प्रमुख मार्गदर्शक प्रमुख पाहूणे म्हणून नवनिर्वाचित पं.स सदस्य डॉ. तातेराव वाघमारे, नागनाथ चव्हाण, विष्णु आचार्य, माधव सिरसाट, राहूल गंडले यांची उपस्थिती होती.नुकत्याच पार पडलेल्या पं.स. निवडणुकीत डॉ. तातेराव वाघमारे विजयी झाल्याबद्दल सर्व उपस्थित अल्पभुधारक गायरान धारकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी नागनाथ चव्हाण उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, शेतीत रासायनिक खते व औषधांचा भरमसाठ वापर केल्याने जमिनीचा पोत कमी होत आहे.अन्नधान्य व भाजीपाला विषयुक्त निर्माण होत आहे त्याच्यातुनच मानवी अरोग्यावर नकारात्मक परिणाम होत आहे अलिकडे ह्दय विकाराचा झटका,कॅन्सर, सारखे दुर्धर आजार मोठ्या प्रमाणात वाढले असून अल्पभुधारक शेतकऱ्यांनी मोठ्या जमिनदाराची नक्कल न करता आपली शेती रासायनिक पध्दतीने न करता अरोग्य सुदृढ आणि निरोगी रहाण्या करिता सेंद्रीय पध्दतीचा अवलंब करून उपजिविकेसाठी शेती केली पाहिजे. तर बचत गटाच्या महिलांनी छोटे मोटे उद्योग उभारून स्वयं रोजगाराचा मार्ग निवडला पाहीजे या करिता शासकिय पातळीवर अनेक योजना आहेत त्या योजनांचा लाभ घ्यायला हवा यावेळी डॉ.तातेराव वाघमारे,माधव सिरसाट,राहूल गंडले, सुभाष चव्हाण यांनी ही मेळाव्यास मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू आचार्य प्रास्ताविक अंकूश चिकटे तर आभार डिगंबर चव्हाण यांनी मानले.यावेळी पानगांव,तत्तापूर,गरसुळी,डिगोळ (दे), आरजखेडा,पोहरेगांव येथील शेकडो अल्पभुधारक शेतकारी व महिला उपस्थित होत्या.

मेळाव्या नंतर गायरान जमिनीचे पंचनामे करून १ ई ला नोंद घ्यावी, सरकारी गायरान जमिनीवर असणाऱ्या घरांची नोंद करून ती जागा नाववर करावी आदि मागण्यांचे निवेदन रेणापूरच्या तहसीलदांना देण्यात आले.

## संक्षिप्त...

### अवकाळीतील पिकं, फळबागांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची आमदार अभिमन्यू पवारांची अधिवेशनात मागणी

**औसा :** औसा विधानसभा मतदारसंघात २३ फेब्रुवारी रोजी झालेल्या अतिवृष्टी व गारपिटीमुळे औसा मतदार संघातील औसा तालुक्यातील किल्लारी, मातोळा, लामजना, मातोळा मंडळातील व निलंगा तालुक्यातील आठ गावातील पिके व फळबागांचे नुकसान झाले असून पंचनामे करून शेतर्कयांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी विधानसभेच्या अधिवेशनात केली आहे. औसा विधानसभा मतदारसंघातील औसा तालुक्यातील किल्लारी, लामजना, मातोळा मंडळात व निलंगा तालुक्यातील बामणी, धानोरा, मदनसुरी, भूतमुंगडी, येलमवाडी, आनंदवाडी, लिंबाळा व भंगार चिंचोली या गावांना अतिवृष्टीसह गारपिटीचा मोठा फटका बसला आहे. अचानक झालेल्या या हवामान बदलामुळे उभ्या पिकांची नासाडी झाली असून गहू, हरभरा, ज्वारी यांसारख्या रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी द्राक्षे, आंबा, केळी फळबागांनाही फटका बसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. औसा तालुक्यातील किल्लारी, लामजना व मातोळा मंडळातही जोरदार पावसामुळे शेतीचे नुकसान झाले आहे. आधीच उत्पादन खर्च वाढलेला असताना अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. या संदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित करताना आमदार अभिमन्यू पवार यांनी शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी केली. त्यावर उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी राज्यातील विविध भागांत झालेल्या अवकाळी पावसाच्या पार्श्र्वभूमीवर सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात येतील असे सांगितले आहे. नुकसान झालेल्या भागात तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून शासनाने त्वरीत निर्णय घेऊन आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

### वाढवणा ग्रामीण रुग्णालय लवकरच ग्रामीण भागातील नागरिकांच्या सेवेत : माजी मंत्री आ.संजय बनसोडे

**उदगीर :** ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्याच्या सेवा उपलब्ध करून देण्यासाठी उदगीर तालुक्यातील वाढवणा येथे ग्रामीण रुग्णालयाची उभारणी केली असून या अधिवेशनानंतर ग्रामीण भागातील जनतेच्या सेवेत उपलब्ध करणार असल्याची माहिती माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी बोलताना दिली आहे.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य रुग्णांची आरोग्य सेवेच्या बाबतीत गैरसोय होत होती ही बाब आमदार संजय बनसोडे यांच्या लक्षात आल्यानंतर मागील त्यांच्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात त्यांनी वाढवणा येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर करुन त्याची उभारणी केली तर मंगरुळ,घोणसी व

गुडसुर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले असून या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर वाढवणा येथील ग्रामीण रुग्णालय सुरू करणार असल्याचे सांगितले आहे. या अनुषंगाने राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांची भेट घेऊन वाढवणा ग्रामीण रुग्णालयात कर्मचाऱ्यांची पदभरती, ट्रॉमा केअर यासह राहिलेले सर्व प्रश्न मार्गी लावावेत अशी विनंती आमदार संजय बनसोडे यांनी केली या त्यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करुन आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांनी सर्व प्रश्न मार्गी लावून अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर वाढवणा ग्रामीण रुग्णालय सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. वाढवणा येथील या ग्रामीण रुग्णालयामुळे परिसरातील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याच्या सर्व सुविधा उपलब्ध होणार असुन दहा - पंधरा किलोमीटरचा प्रवास करून उदगीर शहरात येणाऱ्या रुग्णांसाठी हे ग्रामीण रुग्णालय नवसंजीवनी देणारे असल्याने आमदार संजय बनसोडे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## दैठणा येथेल सप्ता कमिटीचा गणेश महाराज मोरे यांच्या हस्ते सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २५ फेब्रुवारी :** दैठणा येथील बहुचर्चित १४ दिवसांच्या बीजेच्या सप्तयासाठी निधी संकलनाच्या कामानिमित्त पुणे येथील देहू या ठिकाणी गेलेल्या सप्त्याच्य कमिटीच्या सदस्यांचा गणेश महाराज मोरे (संत तुकाराम महाराज यांचे ११ वे वंशज) आणि तुकाराम महाराज देहू संस्थानचे विश्र्वस्त यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी दैठणेकरांचा टॉवेल, श्रीफळ व संत तुकाराम महाराजांची पवित्र गाथा भेट देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन नारायण गुडमेवार यांनी केले.

सत्कार समारंभास जिल्हा मध्यवर्तीचे संचालक व्यंकटराव बिरादार, दैठणा गावचे माजी उपसरपंच एम. एस. बिरादार, विद्यमान उपसरपंच योगेश बिरादार, विश्वनाथ तोटे, दैठणा येथील ज्येष्ठ समाजसेवक सुखदेव पाटील, गणेश बिरादार तसेच नारायण गुडमेवार आदी मान्यवर उपस्थित होते.

या सत्कारामुळे दैठणा गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून सप्तय सोहळ्याबाबत ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# मराठी विश्वकोश म्हणजे अधिग्राह्य ज्ञानाचा साठा - संतोष गेडाम

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २५ फेब्रुवारी :** मराठी विश्वकोशातल्या प्रत्येक नोंदी त्या त्या विषयातील तज्ज्ञ लेखकांकडून आणि संदर्भानिशी लिहून त्या विविध चाळणीतून जाऊन नंतर प्रकाशित होत असतात.मराठी विश्र्वकोश म्हणजे अधिग्राह्य ज्ञानाचा साठा आहे असे उद्गार महाराष्ट्र राज्य मराठी विश्र्वकोश निर्मिती मंडळातील विद्याव्यासंगी सहाय्यक संतोष गेडाम यांनी काढले. ते छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय, उदगीर, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबई आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उप-परिसर लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मराठी विश्वकोश समाजशास्त्र नोंदलेखन कार्यशाळेत बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव पी.टी.शिंदे तर प्रमुख पाहुणे पुंडलिकराव पाटील, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य डॉ. नरसिंग कदम हे उद्घाटक,मराठी विश्वकोश समाजशास्त्राचे माजी समन्वयक डॉ.अनिल जायभाये, तर प्रमुख उपस्थिती कार्यक्रमाचे संयोजक प्राचार्य डॉ.रामकिशन मांजरे, सिनेट सदस्य डॉ.विष्णू पवार, प्रबंधक बालाजी पाटील यांची होती.

पुढे बोलताना गेडाम म्हणाले, विश्र्वकोशामध्ये अधिकृतरित्या सर्व नोंदी केल्या जातात. त्यामुळे विश्वकोशातील ज्ञानाचा साठा हा शासनमान्य व सर्वमान्य आहे असेही ते म्हणाले. कार्यक्रमाची सुरुवात मराठी विश्वकोश गीताने करण्यात आली. त्यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले याप्रसंगी उद्घाटक डॉ.कदम म्हणाले, मराठी विश्वकोशामध्ये सर्व विषयाच्या नोंदी असतात. शास्त्र,भाषा, कला आदी गोष्टींच्या नोंदी त्यामध्ये असतात.या नोंदी करत असताना मराठी भाषेमध्ये त्या केल्या जातात.

दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. अनिल जायभाये हे मार्गदर्शन करताना म्हणाले, विश्वकोशामध्ये नोंदलेखन करत असताना त्या पारदर्शकपणे केल्या जातात. ऐकिवात असलेल्या किंवा एका बाजूला झुकते माप देऊन नोंदी केल्या जात नाहीत. संदर्भ असल्याशिवाय नोंदी स्वीकारल्या जात नाहीत. त्यामुळे हा ज्ञानाचा खूप मोठा खजिना आहे असेही ते म्हणाले. यानंतर प्रश्न उत्तरासाठी काही वेळ देण्यात आला.यावेळी विविध प्रश्नांवर चर्चा झाली. अभ्यासकांच्या शंका दूर करण्यात आल्या.

उपस्थितांमध्ये प्रातिनिधिक स्वरूपामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. कांत जाधव, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण समितीच्या सदस्या सौ. अनिता येलमटे यांनी मनोगत व्यक्त केले आणि कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल आभार व्यक्त केले. अध्यक्षाच्या वतीने अध्यक्षीय समारोप प्राचार्य मांजरे यांनी केला.त्यावेळी ते म्हणाले, मराठी विश्वकोशामध्ये सर्व विषयाचे लेखन असते. अतिशय सूक्ष्मपणे आणि महत्त्वाचे संदर्भ घेऊन त्याचे लेखन केले जाते. मीही विश्वकोशासाठी लेखन केलेले आहे. उदगीरमधून विश्वकोशासाठी जास्तीत जास्त नोंदलेखक तयार व्हावेत तेव्हाच या कार्यशाळेचे फलित झाले असे मी म्हणेल असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.बालाजी सूर्यवंशी, डॉ.व्हि.के. भालेराव यांनी प्रास्ताविक कार्यशाळेचे संयोजक प्राचार्य डॉ.रामकिशन मांजरे यांनी तर आभार डॉ.व्हि.डी.गायकवाड यांनी मानले. कार्यशाळेला सर्व क्षेत्रातून सर्व विषयाचे अभ्यासक उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## थ्रीडी किल्ल्यांसह ५००० दुर्मिळ पोस्ट तिकिटांचे १ मार्चला प्रदर्शन

### उदगीरच्या शिक्षक साहित्य संमेलनात शिवकालीन इतिहास

**उदगीर/प्रतिनिधी :** रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठान, उदगीरच्या वतीने आयोजित शिक्षक साहित्य संमेलनात यंदा इतिहास आणि संस्कृतीचा अनोखा संगम पाहायला मिळणार आहे. येत्या १ मार्च रोजी सकाळी ९:३० वाजता लिंकन इंटरनॅशनल स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा वारसा सांगणारे भव्य प्रदर्शन भरवण्यात येणार आहे.

या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स' मधील १२ गड-किल्ल्यांच्या हुबेहूब थ्रीडी (३ऊ) प्रतिकृती. यामध्ये महाराष्ट्रातील रायगड, शिवनेरी, राजगड, सिंधुदुर्ग यांसह तामिळनाडूतील जिंजी किल्ल्याचा समावेश आहे. साने गुरुजी शाळेतील शिक्षक संदीप नकाशे यांनी 'स्वाभिमान मराठी संस्कृती' उपक्रमांतर्गत या प्रतिकृती साकारल्या आहेत. यासोबतच डॉ. कुलभूषण कंडारकर व डॉ. माधुरी कंडारकर यांचा ५००० हून अधिक दुर्मिळ पोस्ट तिकिटांचा संग्रहही प्रदर्शित केला जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक जाणीव निर्माण करणारा हा उपक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असणार आहे.

इतिहास, संस्कृती आणि साहित्य यांचा संगम या संमेलनातून विद्यार्थ्यांना इतिहास केवळ पुस्तकातून नव्हे, तर प्रत्यक्ष दर्शनातून अनुभवता येणार असून स्वराज्य, स्वाभिमान, संस्कार आणि सांस्कृतिक जाणीवा जागृत करण्याचा हा आहे. सदरील दोन्ही दालनांचा आस्वाद साहित्यिक, कलाकार,इतिहास प्रेमी,शिक्षक बांधव व विद्यार्थी मित्रांनी घ्यावे. इतिहास, संस्कृती आणि साहित्य यांचा संगम घडवणारे हे संमेलन उदगीरकरांसाठी एक प्रेरणादायी पर्व ठरणार आहे.

**- प्रा. बिभीषन मद्देवाड,**

**अध्यक्ष, रंगकर्मी कला क्रीडा प्रतिष्ठान.**

# बाधीत पिकं,फळबागांची आमदार अभिमन्यू पवार यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. २५ फेब्रुवारी :** अवकाळी पावसासह गारपिटीने कासार सिरसी मंडळ परिसरातील रब्बी पिके आणि फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या भागातील सिंगनाळ, माळेगाव आणि जेवरी शिवारातील नुकसानग्रस्त शेतीची गुरुवार दि. २६ रोजी आमदार अभिमन्यू पवार यांनी प्रशासनासमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. व शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला व नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.



गारपिटीमुळे गहू, हरभरा यांसारखी रब्बी पिके आडवी झाली असून फळबागांनाही मोठा फटका बसला आहे. अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. याची दखल घेत आमदार पवार यांनी संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे पूर्ण करून शासनाकडे मदतीचा प्रस्ताव सादर करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत मिळावी, यासाठी प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करावी, असे त्यांनी यावेळी सांगितले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. शासनस्तरावरून आवश्यक ती मदत निश्र्चितच दिली जाईल, असा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या पाहणी दौऱ्यात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी माने, क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष अड. परीक्षीत पवार, कृषी विभागाचे अधिकारी तसेच स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नैसर्गिक आपत्तीच्या या कठीण प्रसंगी शासन व प्रशासन शेतकऱ्यांच्या सोबत असल्याचा ठाम संदेश या पाहणीतून देण्यात आला.

**PAPER PROCLAMATION**
**IN THE COURT OF THE SENIOR CIVIL JUDGE AND JMFC AT BASAVAKALYAN**
**O.S No. 27/2024**

**Plaintiff -- Bhimrao and others**
**Vs**
**Defendants -- Gayabai and others**
**Claim: Suit for Partition and Separate Possession.**

**PAPER PUBLICATION**

That, the plaintiff has files a Suit for Parition and separate possession against the defendants in which the suit summons of the defendant no.3 is issued through paper publication, the same may kindly be published in news paper of Taruna Bharat daily news paper widely circulated in Latur District (MS), the next hearing date of the above case is on 31.01.2026 so the same may be published to appear on 16-4-2026 (at 11.00 A.M. before the Hon'ble Senior Civil Judge and JMFC court Basavakalyan.

**Defendant No.3**
**Sheela W/o Dayanand Natekar D/o Bhimrao Kamble R/o Village Malegaon, Tq: Nilanga, Dist: Latur (MS)**

Given my hand under and the seal of the court this 16th day of February 2026.

Sd/-
**Chief Ministerial officer**
**Senior Civil Judge at**
**Basavakalyan**

# लोककल्याण हा डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराजांचा मूलमंत्र

## भक्ती स्थळास निधीकमी पडूदेणार नाही : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २५ फेब्रुवारी :**

राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराजांचे भक्तीस्थळ येथे हजारो भक्तांनी संजीवन समाधीचे दर्शन घेतले यावेळी गुरुराज माऊली च्या गजरात भजन कीर्तन व नामाची कीर्तनामध्ये भक्त रममान झाले होते.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी भक्ती स्थळे भक्तांचे माहेरघर असून त्यांच्या विकासासाठी कटिबद्ध असून भक्ती स्थळासाठी भरीव निधीची तरतूद शासनातर्फे करण्यात येणार असल्याचे सांगितले ते पुढे म्हणाले की राष्ट्रसंतांचे जीवन एक आदर्श जीवन होते लोककल्याण हाच त्यांचा जीवनाचा मूलमंत्र होता त्यांच्या संजीवन समाधीमुळे अहमदपूर व भक्तीचा परिसर शिवमय झाला आहे त्याचा विकास करण्याची जबाबदारी शासनाच्या माध्यमातून मी पूर्ण करणार.

यावेळी सकाळच्या सत्रात १०८ श्री शिवानंद शिवाचार्य महाराज मलुरकर यांचे शिव कीर्तन झाले व्यासपीठावर नीलकंठ शिवाचार्य महाराज धारेश्वर कर, शंकर लिंग शिवाचार्य महाराज शिरूर अनंतपाळकर, संगण वसप्पा शिवाचार्य महाराज निलंगा मठ, भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी महाराज, शिवा संघटनेचे अध्यक्ष मनोहर धोंडे शिवा संघटनेचे सहसचिव उमाकांत शेटे,दत्ता खकरे, जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्ल गुंडरे, राष्ट्रवादीचे शिवानंद हेगणे, अहमदपूरचे नगराध्यक्ष एडवोकेट स्वप्निल व्हते भक्ती स्थळाचे प्रमुख भगवंतराव पाटील चांभारगे कर, मन्मथआप्पा पालापुरे, सिद्धेश्र्वर पाटील, शिवप्रसाद कोरे, सुप्रिया घोटे, देवणे महाराज, शिवलिंग पाटील किनिकर, प्रताप पाटील, ओम पुणे, प्रा. विश्वंभर स्वामी यांचे प्रमाणे महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार प्रवचनकार गायक वादक व भक्तमंडळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

समाधी मंदिराचे बांधकाम मुख्यमंत्र्यांच्या शुभ हस्ते समाधी मंदिराचे बांधकाम येत्या काही दिवसात आरंभ होणार असून त्यासाठी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना व सहकार मंत्री निमंत्रित करणार असल्याचे शिवा संघटनेचे अध्यक्ष मनोहर धोंडे यांनी सांगितले. संजीवन समाधीच्या दर्शनासाठी गर्दी संजीवन समाधी वर्षातून गुरुपौर्णिमा व राष्ट्रसंतांचा जन्मोत्सव या दोनच दिवशी दर्शनासाठी खुली केली जाते त्यामुळे भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून आली. दिंड्यांच्या आगमन जन्मोत्सवासाठी नांदेड लातूर धर्माबाद मंगनाळी चा अनेक गावच्या दिंड्या मोठ्या प्रमाणावर दाखल झाल्या होत्या.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अतिष दांडेगावकर यांचा भाजपमध्ये प्रवेश

## जिल्ह्यात भाजपला बळ मिळणार, राजकीय समीकरणे बदलणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचे सुपूत्र अतिष दांडेगावकर यांनी गुरूवार दि २६ फेब्रुवारी रोजी मुंबईत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रवेश केला आहे. या पक्ष प्रवेशामुळे राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठा धक्का बसला असून आता जिल्ह्यात भाजपला मोठे बळ मिळणार असून राजकीय समीकरणे बदलणार आहेत. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीवर याचा परिणाम होणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

वसमत विधानसभा मतदारसंघातून सुमारे २ हजार कार्यकर्त्यांसह अतिष दांडेगावकर यांनी दि २५ फेब्रुवारी रोजी मुंबईकडे भाजपमध्ये प्रवेश करण्यासाठी प्रस्थान केले होते. तत्पूर्वी त्यांनी त्यांचे वडील माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचे आशिर्वादही घेतले. तसेच कार्यकर्त्यांचा आग्रह आणि विकासाच्या कामाला महत्व देत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर आज मुंबई येथे भाजपच्या पक्ष कार्यालयात भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये अतिष दांडेगावकर यांनी कार्यकर्त्यांसह जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. डॉ प्रज्ञा सातव, माजी जि प सदस्य अंकुश आहेर यांची उपस्थिती होती.

अतिष दांडेगावकर यांच्या भाजप प्रवेशामुळे हिंगोली जिल्ह्यात भाजपला आणखी बळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे. विशेषत: वसमत विधानसभा मतदारसंघात भाजपची ताकद वाढणार आहे.

यापूर्वी काँग्रेसच्या विधान परिषद सदस्या डॉ प्रज्ञा सातव यांनीही महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशामध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये मुंबई येथे भाजपमध्ये प्रवेश केला होता.

वसमत विधानसभा मतदारसंघात अतिष दांडेगावकर यांच्या माध्यमातून मराठा चेहरा तसेच युवा नेतृत्व भाजपला मिळाल्यामुळे तसेच माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचे सुपूत्र तसेच स्वच्छ प्रतिमा असलेले नेतृत्व भाजपला मिळाले आहे. त्यामुळे वसमत शहरासह तालुक्यात भाजपची ताकद निश्चितपणे वाढणार आहे.

अतिष दांडेगावकर यांच्यामुळे पक्ष संघटनाला मोठी मदत मिळणार आहे. कळमनुरी विधानसभा मतदारसंघात माजी आमदार डॉ प्रज्ञा सातव यांच्या प्रवेशामुळे भाजपला चांगले बळ मिळणार आहे. स्व राजीव सातव यांना मानणारा मोठा वर्ग कळमनुरी मतदारसंघात असल्यामुळे या विधानसभा मतदारसंघातही भाजपला ताकद मिळणार आहे.

सध्या जिल्ह्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला उतरती कळा लागली आहे मात्र शिवसेना शिंदे गटाचे आ. संतोष बांगर यांनी नगर पालिका निवडणुकीत आक्रमक प्रचार करीत भाजपला कळमनुरी आणि हिंगोली या दोन्ही ठिकाणी धुळ चारली आहे. जिल्ह्यात शिवसेनेचा वाढता प्रभाव लक्षात घेता शिवसेनेला टक्कर देण्यासाठी डॉ प्रज्ञा सातव यांच्या माध्यमातून कळमनुरी विधानसभा मतदार संघात चांगले नेतृत्व मिळाले आहे तर वसमतमध्ये शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आ. राजू नवघरे यांना टक्कर देण्यासाठी अतिष दांडेगावकर यांच्या सारखे नेतृत्व लाभल्यामुळे भाजपला आता जिल्ह्यात मोठे बळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत महायुतीतील शिवसेना शिंदे गट, भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये काट्याची टक्कर होणार असल्याचे चित्र दिसत असून या पक्षातील स्थानिक नेते आता आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. वसमत जिल्हा परिषदेत अतिष दांडेगावकर तर कळमनुरी जिल्हा परिषदेत माजी आमदार प्रज्ञा सातव यांचा कस लागणार असून त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे भाजपला किती यश मिळणार हे निवडणुकीनंतरच समजणार आहे.

# हिंगोलीत २८ फेब्रुवारी, १ मार्चला ग्रंथोत्सव

## ग्रंथ प्रदर्शन-विक्री, नवोदीतांचे कवी संमेलन, परिसंवाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी, कार्यालय हिंगोली यांच्या विद्यमाने 'हिंगोली ग्रंथोत्सव-२०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. कै.रं.रा.बियाणी नुतन साहित्य मंदिर वाचनालय, बियाणी नगर, हिंगोली येथे शनिवार, दि. २८ फेब्रुवारी व रविवार, दि. ०१ मार्च, २०२६ असे दोन दिवसात ग्रंथप्रेमींना विविध कार्यक्रमाची मेजवानी मिळणार आहे. ग्रंथप्रसार, प्रदर्शन व विक्री असा या ग्रंथोत्सवाचा उद्देश असून त्यात शासकीय प्रकाशने व दुर्मिळ ग्रंथ विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत.

दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता कै.र.रा. बियाणी नुतन साहित्य मंदिर वाचनालय, बियाणी नगर येथून मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचा शुभारंभ होणार आहे. या दिंडीमध्ये विविध लोककला सादरीकरण लेझिम पथक, भजनी मंडळ यासह विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे.

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त साहित्यिक श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता ग्रंथोत्सवाचे उद्घाटन होणार आहे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी राहुल गुप्ता हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे पालकमंत्री नरहरी झिरवाळ, खासदार नागेश पाटील-आष्टीकर, मा. बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील, आमदार सर्वश्री सतिश चव्हाण, विक्रम काळे, तान्हाजी मुटकुळे, संतोष बांगर, चंद्रकांत नवघरे, नगराध्यक्षा श्रीमती रेखाताई बांगर, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, औरंगाबाद येथील सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, संतोष जाधव, गजेंद्र बियाणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारच्या सत्रात दुपारी ३ ते ६ या वेळेत कवी संमेलनाचे' आयोजन करण्यात आले आहे. तर दि ०१ मार्च रोजी दुसऱ्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी २ या कालावधीत कृत्रिम बुद्धीमत्ता आणि वाचन संस्कृती या विषयावर प्रा. डॉ. तुकाराम हापगुंडे तर सृजनशील लेखन या विषयावर प्रा. डॉ. दत्ता सावंत यांचे व्याख्यान होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या सत्रात दुपारी ३ ते ४ या वेळेत बदलती सामाजिक परिस्थिती आणि सार्वजनिक ग्रंथालयाची भूमिका या विषयावर व्याख्यान होणार आहे. तर दुपारी ४ वाजता दोन दिवशीय ग्रंथोत्सवाचा समारोप व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात येणार आहे. या दोन दिवसीय ग्रंथोत्सवास उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रंथोत्सव समन्वय समितीने केले आहे.

# माझ्या विरोधात मुंबईत स्टींग ऑपरेशचा कट- मनोज जरांगे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत माझ्या विरोधात स्टींग ऑपरेशनचा कट रचला जात असल्याचा गंभीर आरोप केला आहे. मी गरीबांसाठी काम करतो, म्हणून माझ्याविरोधात योजना आखली जात आहे. मंत्रालयातच काही हालचाली सुरू आहे असा दावा मनोज जरांगे यांनी केला आहे.

हिंगोली जिल्ह्यातील कामठा फाटा येथे शिवजयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात मनोज जरांगे पाटील यांनी बोलतांना येत्या चार ते पाच दिवसांत मुंबईत मोठी खेळी होणार आहे. त्या कटात एका महिलेचाही सहभाग असल्याची माहीती मला मिळाली आहे. स्टींग ऑपरेशनची तयारी सुरू आहे. मात्र आम्हीही काही कमी नाही. आमची यंत्रणा देखील सतर्क आहे. नाव न घेता त्यांनी संबंधितांना इशारा दिला. मी कोणासाठी काम करतो? तर फक्त गरीबांच्या लेकरांसाठी. त्यामुळे मला घाबरवण्याचा प्रयत्न होत असेल तर त्याचा काहीही परिणाम होणार नाही असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या आरोपांमुळे त्यांचा रोख नेमका कोणाकडे आहे याबाबत चर्चा सुरू झाली आहे मात्र त्यांनी कोणत्याही व्यक्तीचे नाव घेतले नाही. कट का रचला जातोय, हे सर्वांना माहीत आहे. मी सामाजिक प्रश्नांवर उभा राहतो. शेतकरी व वंचीतासाठी आवाज उठवतो. त्यामुळे काहींना ते खटकत असावे, असेही ते यावेळी म्हणाले.

दरम्यान, परभणीत शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात उपोषणाला बसलेल्या शेतकऱ्यांचीही जरांगे यांनी भेट घेतली. शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांचे प्रश्न सरकारपर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन त्यांनी शेतकऱ्यांना दिले. यावेळी बोलतांना त्यांनी सांगितले की, कोणत्याही विकास कामासाठी लोकांचा विश्वास महत्वाचा असतो. जमिनीचा प्रश्न हा भावनिक आणि आर्थिक दोन्ही स्तरांवर महत्वाचा आहे. सरकारने संवाद साधून निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पहावे.

अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत बोलतांना जरांगे म्हणाले की, पवार कुटुंबियांना जर सखोल चौकशी हवी असेल तर ती झालीच पाहीजे. सध्या जी माहीती समोर येत आहे त्यावरून अनेकांच्या मनात शंका निर्माण होत आहे. सत्य बाहेर येणे आवश्यक आहे. कोणताही निष्कर्ष काढण्यापूर्वी तपास होणे गरजेचे आहे. आम्ही शेतकरी आणि सामाजिक प्रश्नांवर लढा सुरूच ठेवणार असल्याचा निर्धार यावेळी जरांगे यांनी केला.



**हिंगोली- कनेरगाव नाका शिवारात बनावट नोटा प्रकरणी बासंबा पोलिसांनी आरोपींचा पाठलाग करीत त्यांना बनावट नोटा, कारसह अटक केली. यावेळी सपोनि विकास आडे, उपनिरीक्षक मदन गव्हाणे, जमादार गजानन कऱ्हाळे, कैलास गुंजकर, नामदेव हाके, शेख उमर. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### जरांगे पाटील यांचे लासीना फाट्यावर स्वागत



हिंगोली-हिंगोली जिल्ह्यातील लासीना फाटा येथे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत गावकर्यांच्या वतीने पवन जाधव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. हिंगोली जिल्ह्यातील कामठा फाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हिंगोलीहून कामठा फाटा मार्गावर असलेल्या लासिना फाटा येथे गावकऱ्यांच्यावतीने मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत पवन जाधव पाटील हस्ते करण्यात आले. यावेळी श्रीराम जाधव, शिवाजीराव जाधव, दत्ता जाधव, रामेश्वर जाधव, शिवाजी शिंदे, ज्ञानेश्वर जाधव, शंकर जाधव, आनंदराव जाधव, शंकर चौतमाल, रमाकांत कोळपे, भागवत जाधव, विष्णु जाधव, बद्रिनाथ जाधव यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### १ मार्चला हिंगोलीत भव्य हिंदू संमेलन



हिंगोली-संघटित हिंदू धर्म, शक्तिशाली भारत या संकल्पनेसह, देशातून जातीवादाला निरोप देत, आपण सर्व हिंदू भाऊ आहोत अशी घोषणा देत, १ मार्च रोजी हिंगोली शहरात एक विशाल हिंदू अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. हिंदू धमतील सर्व समुदायांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने, हे भव्य हिंदू अधिवेशन रविवारी दुपारी ४.३० ते ७.३० या वेळेत शहरातील रामलीला मैदानावर होणार आहे. या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य इंद्रेशकुमारजी प्रमुख वक्ते आणि मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या भव्य हिंदू परिषदेचे आयोजन हिंदू परिषदेच्या समिती, हिंगोली शहरातर्फे केले जात आहे. या कार्यक्रमाला सर्व हिंदूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### २४ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २४ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत वाहन चालकांकडून २४ हजारांचा दंड वसूल केला आहे तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत ७ ठिकाणी छापे मारून गुन्हे दाखल केले आहेत.

# कनेरगाव शिवारात बनावट नोटा देणाऱ्या दोघांना पोलिसांनी पकडले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**

हिंगोली ते वाशिम महामार्गावर कनेरगाव शिवारात १ लाख रूपयांच्या बदल्यात २.५ लाख रूपयांच्या बनावट नोटा देणाऱ्या खामगाव येथील दोघांना बासंबा पोलिसांच्या पथकाने दि २५ फेब्रुवारी रोजी रात्री पाठलाग करून पकडले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींकडून बनावट नोटांचे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार नांदेड जिल्ह्यातील लिंगापूर येथील अंतेश्वर भुसारे यांच्यासोबत खामगाव येथील लखन गोपाल बजाज व विजय प्रकाशसिंग ठाकूर या दोघांनी संपर्क साधला. एक लाख रूपयांच्या बदल्यात अडीच लाख रूपये देण्याचे आमिष त्यांनी अंतेश्वर यांना दाखविले. त्यासाठी एक लाख रूपये घेवून हिंगोली ते वाशिम मार्गावर कनेरगावनाका शिवारात येण्यास सांगितले.

त्यानुसार अंतेश्वर हे बुधवार दि २५ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास कनेरगावनाका शिवारात आले होते. यावेळी खामगाव येथून एका कारमध्ये आलेल्या लखन व विजय यांनी त्यांच्यासोबत डील करण्यास सुरूवात केली. मात्र या प्रकाराची माहीती बासंबा पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली बासंबा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विकास आडे, उपनिरीक्षक मदन गव्हाणे, जमादार गजानन कऱ्हाळे, कैलास गुंजकर, नामदेव हाके, शेख उमर यांच्यासह गृहरक्षक दलाचे जवान घटनास्थळी रवाना झाले.

पोलिसांचे वाहन आल्याचे लक्षात येताच लखन व विशाल यांनी त्यांच्या कारने पोलिसांच्या वाहनाला कट मारून पळ काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी चित्रपट स्टाईल कारचा पाठलाग सुरू केला. पोलिसांनी कनेरगाव नाका शिवारातच त्यांच्या वाहनासमोर पोलिसांचे वाहन आडवे लावून दोघांना पकडले. त्यांच्या कारची तपासणी केली असता त्यात चार मोबाईल, भारतीय बच्चो की बँक असे नमुद केलेले पाचशे रूपयांचे पाच बंडल असे अडीच लाख रूपये जप्त केले. याप्रकरणी बासंबा पोलिस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

# हिंगोलीत हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**

मुख्य संरक्षक मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आशिर्वादाने राष्ट्रीय अध्यक्ष राजुदासजी महाराज मंहत हनुमान गढी अयोध्या यांचा मार्च ते एप्रिल महिन्यात हिंदू महासम्मेंलन व ईतर विषयात महाराष्ट्र भर दौरे होणार आहेत. त्या अनुषंगाने हिंगोली येथे जिल्ह्यातील सर्वच हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या महत्त्वाच्या पदाधिकारी यांची दि २६ फेब्रुवारी गुरुवारी शासकीय विश्रामगृह कळमनुरी येथे बैठक पार पडली.

या बैठकीला हिंदू सुरक्षा सेवा संघ जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश कार्यवाह महामंत्री संदिप वाकडे, जिल्हा उपाध्यक्ष गोविंद बेद्रे पाटील, भवर पाटील, महामंत्री शिवाजी उघडे, कळमनुरी शहराध्यक्ष जिद्दी पाटील, तालुकाध्यक्ष अशोकराव मस्के, वसमत तालुकाध्यक्ष अर्जुन बेंडे पाटील, कळमनुरी युवा तालुकाध्यक्ष सोपान घुगे, बाळापुर अध्यक्ष गोविंद भिवकर, वसमत उपाध्यक्ष मंगेश पांचाळ व ईतर पदाधिकारी उपस्थित.हिंदू सुरक्षा सेवा संघ मार्फत दि ०८/०३/२६ ला रविवारी रोजी अकोला येथे प्रदेशाची आढावा बैठक होणार आहे. या बैठकीत महाराष्ट्राचे हिंदू सुरक्षा सेवा संघ-संत प्रकोष्ठ, युवा प्रकोष्ठ-महिला प्रकोष्ठ-विधी आघाडी, अध्यात्मिक आघाडी, वैद्यकीय प्रकोष्ठ चे सर्व जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# कुरूंद्यात नाली बांधकाम निकृष्ट?



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २६ फेब्रुवारी**

तालुक्यातील कुरुंदा येथे पूरस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आमदार राजू नवघरे यांनी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी आणून नदी खोलीकरण व नाली बांधकामाची कामे मार्गी लावली. परंतु सदरील काम हे निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे ग्रामस्थांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांचा आरोप आहे की, गुत्तेदार व बांधकाम विभागातील संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून काम उरकून घेतले जात आहे. नाली बांधकाम सुरू असतानाच सिमेंटचे प्रमाण कमी, वाळू-मुरूम दर्जाहीन आणि काँक्रीट कमकुवत असल्याचे दिसून येत आहे. इतकेच नव्हे, तर नुकत्याच झालेल्या बांधकामाला ठिकठिकाणी मोठ्या भेगा पडू लागल्या असून काही ठिकाणी नाली सरळ न बांधता वाकडी-तिकडी करण्यात आल्याचेही समोर आले आहे. कामाबाबत वेळोवेळी संबंधित इंजिनिअरांना सूचना देऊनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप आहे. उलट, काम दर्जेदारच आहे, असे सांगून तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

कुरुंदा सरपंचांनीही संबंधित विभागाकडे लेखी तक्रार करून काम दर्जेदार पद्धतीने करण्याची मागणी केली होती. मात्र त्यानंतरही परिस्थितीत सुधारणा न झाल्याने गावकऱ्यांचा रोष वाढला आहे. भविष्यात ही नाली पूरपाण्याचा तडाखा सहन करू शकेल का? की पहिल्याच पावसात कोसळून कोट्यवधींचा निधी पाण्यात जाईल? अशी भीती व्यक्त होत आहे.

# सोडेगावामध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**

स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोडेगाव येथे दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. समस्त गावकरी मंडळी व युवा वर्गाच्या पुढाकाराने दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी पूजन व वृक्षारोपण कार्यक्रमाने शिवजयंती उत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर भव्य मोटरसायकल रॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आली. सायंकाळी शिवरायांच्या पालखीचा भव्य सोहळा व मिरवणूक काढण्यात आली. महिला भगिनींनी पालखी मार्गावर सडा-रांगोळी काढून उत्सवाची शोभा वाढवली. शिवव्याख्यान कार्यक्रमात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी लेखक साहित्यिक शिक्षक शिवव्याख्याते डॉ. केशव खटिंग यांनी आपल्या ओजस्वी भाषणातून उपस्थितांना प्रेरित केले. अध्यक्षस्थानी गावचे प्रथम नागरिक तथा सरपंच मा. बाळासाहेब निळकंठे हे होते. प्रमुख पाहुणे जागतिक दर्जाचे चित्रकार शिवराज जगताप

गो . दा.काळे सर मा. भास्करराव पाटील (पोलीस पाटील), मा. राजेश पाटील (चेअरमन), मा. अवधूतरावजी निळकंठे (माजी सरपंच), गजाननराव काळे तंटामुक्ती अध्यक्ष, मा. बाळासाहेब निळकंठे (माजी सरपंच), मा. शहाजी दांडेगावकर (उपसरपंच), मा. पंजाबरावजी निळकंठे व मा. नागोराव निळकंठे, रामेश्वर पाटील अमोल काळे सुभाषराव निळकंठे बालाजी पाटील बाबाराव गुरुजी शिवाजी निळकंठे सर दत्तराव काळे संस्थानाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील सर्व ग्रामस्थ, महिला भगिनी, युवक-युवती व शिवभक्त यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वराज निळकंठे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिवाजी आर निळकंठे यांनी केले जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी समितीचे संदीप निळकंठे स्वराज निळकंठे आदित्य निळकंठे अभि निळकंठे किरण निळकंठे वैभव निळकंठ वरद निळकंठे अक्षय निळकंठे लक्ष्मण पावडे आदित्य काळे तेजस निळकंठे योगेश आदींनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शंभर दिवसाच्या कृती आराखड्यापासुन संकल्पपुर्तीची सुरुवात : खा. अशोक चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ फेब्रूवारी-**

निवडणुकीच्या वेळी भाजपाने संकल्पनामा सादर केला होता. आश्वासने दिलेली होती. त्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्याची सुरूवात १०० दिवसाच्या कृती आराखडा पासून होत असल्याचे खासदार अशोक चव्हाण म्हणाले.

नांदेड महानगरपालिकेने १०० दिवसाचा कृती आराखडा तयार केला असून ज्याची माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी महापौर सौ. कविता मुळे, उपमहापौर दिपकसिंह रावत, भाजपा शहरअध्यक्ष अमरनाथ राजुरकर, गटनेते महेश



कनकदंडे, संदिपसिंघ गाडीवाले, आयुक्त महेशकुमार डोईफोडो, अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम, उपायुक्त, अजितपालसिंघ संधु आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना खासदार अशोक चव्हाण म्हणाले की, १०० दिवसाचा कृती आराखडा तयार करण्यात आला असून याची आमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रभागाच्या अधिकाऱ्यावर आहे. तर यावर नियंत्रण महापौरांचे असणार आहे. ही कामे केली तर अधिकाऱ्यांचा सत्कार होईल, नाही केली तर कारवाई करण्याचा इशारा यावेळी खासदार अशोक चव्हाण यांनी दिला. १०० दिवसाच्या कृती आराखड्यात स्वच्छता, मलनिसारण, गोदावरी नदी प्रदुषण, चौक सुशोभीकरण, ट्रॅफिक सिग्नल, आरोग्य सुविधा अदिंची कामे प्राधान्याने करण्यात येणार असल्याचे अशोक चव्हाण यावेळी म्हणाले.

**संकल्प पुर्तीचे हे पहिले पाऊल : महापौर कविता मुळे**

भाजपाने दिलेल्या संकल्प पुर्तीचे हे पहिले पाऊल असल्याचे महापौर सौ. कविता मुळे म्हणाल्या. जनतेने दिलेली जबाबदारी पुर्ण करण्याची वेळ आली असून दिलेला शब्द पुर्ण करण्यासाठी हा आराखडा तयार करण्यात आला असल्याचे महापौर सौ. कविता संतोष मुळे म्हणाल्या.

**मनपाचा विद्यापीठाशी सामंजस्य करार :कनकदंडे**

यावेळी बोलतांना गटनेते महेश कनकदंडे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व मनपामध्ये सामंजस्य करार करण्यात येणार आहे. विद्यापीठात असलेल्या अत्याधुनिक उपकरनाचा वापर आरोग्याच्या सेवेसाठी करण्यात येणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

# उमरी तालुक्यातील अंडरग्राऊंड रेल्वे पुलांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांचे हाल

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २४ फेब्रूवारी-**

उमरी तालुक्यातील गोरठा रेल्वे गेट अंतर्गत शेलगाव अस्वलदरी, पळसगाव, कारला, गोरठा, कळगाव या परिसरातील रेल्वे पटरीखाली बांधण्यात आलेल्या अंडरग्राऊंड रेल्वे ब्रिजांमध्ये पावसाळ्यात तसेच कॅनॉलचे पाणी आल्यावर सतत पाणी साचत असल्याने नांदेड जिल्हाकडे ये-जा करणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. साचलेल्या पाण्याची पातळी अनेकदा तीन ते चार फूटांपर्यंत पोहोचते, ज्यामुळे रस्ता जवळपास ठप्प होतो.

हा महत्त्वाचा मार्ग दहा गावांना जोडणारा असल्याने रोज मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. मात्र खोल पाण्यात वाहन बंद पडणे, मोटरसायकल घसरणे अशा घटना सतत घडत



असल्याने अपघातांची मालिका सुरूच आहे. अनेक वाहनांची नादुरुस्ती होत असून नागरिकांचे आर्थिक नुकसान वाढत आहे.

स्थानिक पंचक्रोशीतील नागरिकांनी अनेक वेळा प्रशासनाला प्रत्यक्ष भेटून तसेच लेखी तक्रारीद्वारे समस्येबाबत कळवले असले तरी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. रेल्वे प्रशासनालादेखील मेलद्वारे माहिती देण्यात आली असून, लवकर निर्णय घेतला जाईल अशी केवळ आश्वासने दिली जात आहेत.

स्थानिक नागरिकांचा प्रश्न असा की वारंवार अर्ज, तक्रारी करूनही उपाययोजना न करणारे रेल्वे प्रशासन पुढे एखादा मोठा जीवघेणा अपघात झाल्यास जबाबदारी घेणार तरी कोण?

नागरिकांचा रोष वाढत असून प्रशासनाने तातडीने या अंडरग्राऊंड रेल्वे ब्रिजांमधील पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

## सेवा कंप्यूटर तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; सांस्कृतिक कार्यक्रमात उत्साह

किनवट- कंप्यूटर व सेवा बकस क्लासेसतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला पालक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुजाता विनोद एन्ड्रलवार (नगराध्यक्ष, नगर परिषद किनवट) होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून आणिलकुमार महामुने (गटशिक्षणाधिकारी, प.स. किनवट), गणेश कराड (पोलीस निरीक्षक, किनवट), पंढरीनाथ ठाकरे, संदीप केंद्रे, डॉ. पंजाब शेर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक सेवा कंप्यूटरचे संचालक सुरेश जाधव यांनी केले. यावेळी एमएस-सीआयटी (चड-उखढ) अभ्यासक्रमात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. महेवीश ईरम शेख मगदूम यांनी १०० पैकी ९८ गुण मिळवले. नयन राहुल मुनेश्वर, कश्यप राजेश पाटील व जाहीद खान अली अहमद खान यांनी प्रत्येकी १०० पैकी ९९ गुण मिळवून यश संपादन केले. हनमंत संजय गोरे यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष प्राविण्य प्राप्त केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

तसेच बकस कोर्समध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## नामदेव पाटील देगावकर यांची शिवसेना शिंदे सेनेच्या युवा तालुकाध्यक्षपदी

देगलूर-तालुक्यातील शिंदे शिवसेनेच्या नेतृत्वात बदल झाला असून युवा तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी उमदे नेतृत्व नामदेव पाटील देगावकर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे तालुक्यात पक्ष संघटनाला नवे बळ मिळणार हे अधोरेखित झाले आहे. सोमवार दि. २३ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजता ठाणे येथे उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांच्या कार्यालयात देगावकर यांना अधिकृत प्रशस्तीपत्र देण्यात आले. पक्षविस्तार, ग्रामीण भागात संघटन मजबूत करणे आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना सक्रिय करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. या नियुक्ती प्रक्रियेत उपमुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांनी समन्वयाची महत्त्वाची भूमिका बजावल्याचे बोलले जात आहे.

नामदेव पाटील देगावकर यांना यापूर्वी भाजप युवामोर्चाच्या तालुकाध्यक्षपदाचा अनुभव आहे. ग्रामीण भागातील संपर्क, संघटनात्मक कामाचा अनुभव आणि युवकांमधील प्रभाव या पार्श्वभूमीवर त्यांची निवड करण्यात आल्याचे मानले जात आहे. बालाजी पाटील खतगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली देगावकर यांच्यासह ड. अंकुश राजे, डॉ. सुनील जाधव, सुरेश येलबुगडे, ज्ञानेश्वर सुरनर, सतीश धाने, ज्ञानोबा शिंदे, विठ्ठल कोकणे, विलास पाटील आदी कार्यकर्त्यांनी शिंदे शिवसेना गटात प्रवेश केला आहे.

पक्षाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू. गावोगावी शाखा वाढवून युवकांना संधी देण्यात येईल तसेच स्थानिक प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेतली जाईल याशिवाय सध्याचे तालुक्याचे राजकारण अतिशय गढूळ झाले आहे. याला चाप बसून शिंदे शिवसेनेची संघटनबांधणी आणि कार्यकर्त्यांचे बळ एकत्र आणत शिंदे शिवसेना अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्नशील राहणार अशी ग्वाही नूतन अध्यक्ष नामदेव पाटील देगावकर यांनी व्यक्त केली आहे.

## किनवटमध्ये 'बंजारा भवन' उभारणीसाठी ठाम मागणी

**किनवट**-संत सेवालाल महाराज यांची जयंती गोकुंदा येथील के. के. गार्डन येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमासाठी महिला नेत्या श्रीमती बेबीताई नाईक, पुसदच्या नगराध्यक्षा सौ. मोहिनी इंद्रनिल नाईक, किनवटच्या नगराध्यक्षा सौ. सुजाता विनोद एंड्रलवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सचिन नाईक, सुरेश रंगेनवार, करण एंड्रलवार, प्रशांत राठोड, सौ. संध्याताई राठोड, कैलास राठोड, ॲड. राहूल नाईक, प्रकाश गब्बा राठोड, बंडू नाईक, राहूल नाईक यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सचिन नाईक यांनी बंजारा समाजाचा सर्वांगीण विकास अपेक्षित प्रमाणात झाला नसल्याची खंत व्यक्त केली. जयंतीच्या निमित्ताने किनवट येथे बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांच्या नावाने सुसज्ज 'बंजारा भवन' उभारण्यासाठी नगर परिषदेकडून जागा उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली. तसेच राज्यमंत्री मा. इंद्रनिल नाईक यांच्या माध्यमातून राज्य शासनाकडून मंजुरी मिळवून देण्याची विनंती करण्यात आली. यासंदर्भात पुसदच्या नगराध्यक्षा सौ. मोहिनी इंद्रनिल नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मंजुरीसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. किनवटच्या नगराध्यक्षा सौ. सुजाता विनोद एंड्रलवार यांनीही या मागणीला सकारात्मक दृष्टीने होकार दर्शविला. तसेच तालुक्यातील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, वाचनालय आणि संगणकीय ज्ञान सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. सचिन नाईक यांनी मांडलेल्या मागण्यांमुळे बंजारा समाजात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून हे उपक्रम लवकरात लवकर मार्गी लागावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वर जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन धनलाल नाईक यांनी मानले.

# खेळ हे केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे : डॉ.मनेश कोकरे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २६ फेब्रूवारी-**

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी,नांदेड येथे राज्यस्तरीय वार्षिक क्रीडा महोत्सव झेनिथ २०२६ दिनांक २०, २१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी खेळ हे केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे असे मनोगत व्यक्त केले. या स्पर्धेमध्ये विविध खेळांसाठी महाराष्ट्रातील ९ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाने भाग घेतला होता.तर या स्पर्धेमध्ये एकूण ६८९ खेळाडूं अधिकृत सहभागी होते. त्यामध्ये ५१३ मुलांचा व १७६ मुलींचा



समावेश होता.

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी,नांदेड येथे राज्यभरातुन आलेल्या संघांमुळे स्पर्धे ला व्यापक स्वरूप प्राप्त होऊन चुरस निर्माण झाली.या स्पर्धेत झेनिथ अंतर्गत व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कबड्डी, क्रिकेट, फुटबॉल,खो-खो,पवारलिफ्टिंग,बुद्धीबळ, बैडमिंटन, हैंडबॉल इत्यादी क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्पर्धा दिनांक २०, २१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पारपडल्या. या स्पर्धेत महाराष्ट्रातील नांदेड, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, भंडारा, शेगाव, नागपूर, जळगाव, चंद्रपूर तसेच भोपाळ येथील विविध दहा अभियांत्रिकी महाविद्यालयांमधून एकूण ६८९ खेळाडूं अधिकृत सहभागी होते. त्यामध्ये ५१३ मुलांचा व १७६ मुलींचा समावेश होता.यावेळी मान्यवरानी आपली मनोगते व्यक्त केली.संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य संत बाबा सुखविंदर सिंघजी व बालाजी कल्याणकर यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले तरसंस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी आपल्या विस्तृत भाषणात सांगितले की, खेळ हे केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे. नेतृत्वगुण, आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि संघभावना यांचा विकास क्रीडेमुळेच होतो. मैदानावर मिळणारे अनुभव विद्यार्थ्यांना आयुष्यातील प्रत्येक क्षेत्रात सक्षम बनवतात. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धार्थ देसाई हे होते तसेच डॉ.जीत पाटील, तिलक जाधव, भास्कर कदम, सागर भाऊ यांनी क्रिडामहोत्सव पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. विजेत्या संघांना व खेळाडूंना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे व रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.समारोपप्रसंगी सर्व मान्यवरांनी झेनिथ टीमच्या कार्याचे कौतुक केले.

## निर्मल कुमार सूर्यवंशी यांना शासनाचा उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार'

नांदेड नांदेड प्रतिनिधी

साहित्य क्षेत्रात अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जाणारा महाराष्ट्र शासनाचा 'श्री. पु. भागवत उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार' २०२५ या वर्षासाठी नांदेडचे भूमिपुत्र आणि 'निर्मल प्रकाशन'चे सर्वेसर्वा निर्मल कुमार सूर्यवंशी यांना जाहीर झाला आहे. या गौरवशाली यशाबद्दल छावा मराठा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर यांच्या वतीने सूर्यवंशी यांचा सन्मान करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

नांदेडच्या एका भूमिपुत्राने प्रकाशन व्यवसायातील आपली स्वतंत्र ओळख निर्माण करून हा राज्यस्तरीय बहुमान मिळवणे, ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. या पुरस्काराचे स्वरूप ५ लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे असून, येत्या २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिनी' नाशिक येथे त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. त्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल छावा मराठा संघटनेच्या वतीने निर्मल कुमार सूर्यवंशी यांचा ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. या प्रसंगी छावा मराठा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर यांच्यासह डॉ. नागेश कल्याणकर, डॉ. प्रभाकर जाधव, शिवानंद पाटील, दीपक पाटील, गोटू पाटील राजूरकर, गणेश वडजे, साहेबराव भोसले आणि जयंत भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

# प्रतिकुलतेशी दोन हात करत बालाजी बट्टेवाड यांची असिस्टंट मॅनेजर पदी निवड

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २६ फेब्रूवारी-**

परिस्थिती व्यक्तीला घडवत नाही, तर व्यक्तीच आपल्या जिद्द, आत्मविश्वास आणि अथक परि श्रमांच्या बळावर परिस्थिती बदलू शकतो, या वाक्याची प्रचिती नायगांव तालुक्यातील नरसीतील बालाजी त्र्यंबक बट्टेवाड यांनी आपल्या कर्तृत्वातून घडवून दाखवली आहे.



अत्यंत साध्या कुटुंबातून येत, अनेक अडचणी आणि प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत बालाजी यांनी शिक्षणाची कास कधीही सोडली नाही. ध्येय डोळ्यासमोर ठेवून सातत्यपूर्ण अभ्यास, चिकाटी आणि अपार मेहनतीच्या जोरावर त्यांनी नुकत्याच घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत अव्वल क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाची दखल घेत त्यांची महाराष्ट्र ग्रामीण बँकेत असिस्टंट मॅनेजर पदावर निवड झाली आहे.

बालाजी बट्टेवाड यांचा हा प्रवास केवळ वैयक्तिक यशापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण नरसी गावा- साठी आणि पंचक्रोशीतील नागरिकांसाठी अभि मानाची व विशेष कौतुकास्पद ठरला आहे. कठीण परिस्थितीतही न खचता,आत्मविश्वास आणि सातत्याच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, हे त्यांनी कृतीतून सिद्ध केले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल नरसी येथील शिवाजी नारे, आनंदराव सूर्यवंशी, गोविंदराव टोकलवाड, मारोती सूर्यवंशी , देविदास सुर्यवंशी,तसेच मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छांचा वर्षाव केला. बालाजीचे यश आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी पुढील कारकिर्दीत ही अशीच भरारी घ्यावी आणि गावाचे नाव अधिक उंचवावे, अशा शब्दांत भावना व्यक्त करण्यात आल्या.

आजच्या स्पर्धात्मक युगात जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास यांच्या बळावर कोणतीही अडचण पार करता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे बालाजी त्र्यंबक बट्टेवाड होत. त्यांचा हा यशस्वी प्रवास उद्याच्या पिढीसाठी निश्चितच दीपस्तंभ ठरणारा असून त्यांच्या पुढील उज्वल कारकिर्दीस सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

## समृद्धी महामार्ग संपादित जमिनीचा मावेजा शेतकऱ्यांना लवकरच मिळणार -आमदार हेमंत पाटील

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ फेब्रूवारी-**

नांदेड ते जालना दरम्यान होणाऱ्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गासाठी नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित होऊन अनेक दिवस झाले आहेत. परंतू आज पर्यंत शेतकऱ्यांना पूर्ण मोबदला मिळाला नसल्याचा ज्वलंत मुद्दा आमदार हेमंत पाटील यांनी विधान परिषदेत उपस्थित केला. यावेळी उत्तर देताना संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांनी सांगितले की ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांना लवकरच मोबदला वितरित करण्यात येणार आहे.

आमदार हेमंत पाटील यांनी विचारलेल्या या प्रश्नाला उत्तर देताना राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, जालना-नांदेड दरम्यान होणाऱ्या समृद्धी महमार्गात ज्या शेतकरी बांधवांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. त्या शेतकऱ्यांना मावेजा देण्याबाबत राज्य शासनाने योग्य ती कारवाई केली असून देण्यात येणारा मावेजा नांदेड जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून लवकरच त्याचे वाटप करण्यात येणार आहे असे आदेश संबंधितांना दिले आहेत असेही मंत्री महोदय म्हणाल्या. आमदार हेमंत पाटील यांनी शेतकऱ्याच्या हिताच्या दृष्टीने महत्वाच्या प्रश्नाला सभागृहात उपस्थित करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. आमदार हेमंत पाटील यांनी सांगितले की, काही शेतकऱ्यांना प्राथमिक मोबदला मिळाला असला तरी पुनर्मूल्यांकन, अतिरिक्त भरपाई आणि कागदपत्रांच्या त्रुटीमुळे मोठ्या संख्येने प्रकरणे प्रलंबित आहेत. यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून शेती गमावूनही त्यांना योग्य भरपाई मिळत नसल्याची परिस्थिती आहे.

# सामाजिक विषमते विरुद्धचा आवाज म्हणजे संत रविदास महाराज : प्रवीण गायकवाड

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २६ फेब्रूवारी-**

संत रविदास महाराज हे या देशातील महान विचारवंत आणि कर्ते सुधारक होते. त्यांनी व्यवसाया बरोबर विचारांची शिदोरी समाज व्यवस्थेला अर्पण केली म्हणून जो शिख धर्म ग्रंथाला गुरु मानतो त्या ग्रंथ गुरु साहिब मध्ये संत रविदासांच्या विचारांना कोरल्या गेले आहे.

सामाजिक विषमते विरुद्धचा आवाज म्हणजे संत रविदास महाराज असल्याचे मत प्रवीण गायकवाड यांनी व्यक्त केले ते राष्ट्रीय चर्मकार परिषद मुदखेडच्या वतीने संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या जयंती दिनानिमित बोलत होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज,संत शिरोमणी रविदास महाराज,राष्ट्रसंत गाडगे बाबा,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,संत सेवालाल महाराज,कैकया स्वामी,माता रमाई यांच्या तैल चित्रांना पुष्प पुजा व पुष्पहार अर्पण करून विचार मंथन करत जयंती साजरी करण्यात आली.

पत्रकार गंगाधर डांगे,संजय आउलवार,मनोज कमठे, प्रल्हाद मस्के,संदीप मोडवान,पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण,यांची समायोचित भाषणे झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माधव पा.कदम तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रवीण गायकवाड यांची उपस्थीती होती.


यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शंकर मुतकलवाड,माजी उपनगराध्यक्ष शंकर राठी, नगरसेवक शाम चंद्रे, नगरसेवक संजय आउलवार, नगरसेवक उपेंद्र देवदे, नगरसेविका सौ निकिता सोनटक्के,सपोनि बि.आर.कांबळे,माजी नगरसेवक कैलास गोडसे, युवा काँग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण, नगरसेवक अविनाश चौदंते,किशोर पारवेकर, चांदु बोकेफोड,नगरसेवक प्रतिनिधी महादू चमकुरे, प्रभाकर पांचाळ,नईम बागवान,उमाकांत घोंगडे,वशीम भाई,नितिन चौदंते,पत्रकार संतोष गाढे,साहेबराव गागलवाड,ईश्वर पिन्नलवार, हाफिज कुरेशी,डॉ.कृष्णा पवार,उद्योजक शिवानंद देवके,संजय चव्हाण,माजी सरपंच गंगासागरे, साहेबराव जोंधळे,कपिल लोखंडे,पिंटू ठाकूर,सुधाकर सूर्यवंशी, यांच्यासह सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार यांची उपस्थिती होती. जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी संजय उर्फ पप्पू सोनटक्के, देशमाने,विठ्ठल सोनटक्के,बालाजी सोनटक्के धारबा सोनटक्के आणि असंख्य महिला भगिनी व समाज बांधव यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष सावंत यांनी केले तर आभार दत्ता सोनटक्के यांनी मानले.

# भारत- सौदी अरेबिया संसदीय मैत्री समूहात खा. डॉ. अजित गोपछडेंची निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ फेब्रूवारी-**

राज्यसभेचे सदस्य डॉ. अजित गोपछडे यांची १८ व्या लोकसभेच्या कार्यकाळासाठी गठित भारत - सौदी अरेबिया संसदीय मैत्री समूहाच्या सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी ही नियुक्ती केली आहे.

भारत आणि सौदी अरेबिया यांच्यातील संसदीय संवाद, द्विपक्षीय सहकार्य, सांस्कृतिक आदानप्रदान तसेच धोरणात्मक संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या या समूहात डॉ. गोपछडे यांचा समावेश होणे हे त्यांच्या अभ्यासपूर्ण दृष्टिकोन आणि विकासात्मक नेतृत्वाचे प्रतीक मानले जात आहे. संसदीय कार्यातील सक्रिय सहभाग, विषयांचा सखोल अभ्यास आणि विविध स्तरांवरील प्रतिनिधींशी सुसंवाद राखण्याची क्षमता या गुणांमुळे त्यांची या समूहासाठी निवड करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय संवादात विश्वास, संयम आणि परस्पर आदर या मूल्यांना विशेष स्थान असते, आणि या मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.



या सातत्यपूर्ण राजनयिक परंपरेच्या पार्श्वभूमीवर संसदीय मैत्री समूहांची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण ठरते. ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक, प्रवासी भारतीयांचे हित, पर्यटन तसेच विविध क्षेत्रातील भागीदारी या क्षेत्रांत भारत-सौदी अरेबिया संबंध सातत्याने बळकट होत असताना, संसदीय स्तरावरील संवादातून परस्पर समज, सहकार्य आणि विश्वासाचे नवे आयाम विकसित होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

डॉ. गोपछडे यांनी या नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना भारताच्या राष्ट्रीय हितांना सर्वोच्च प्राधान्य देत दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे नमूद केले. तर या निवडीबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपति तथा राज्यसभा अध्यक्ष सी पी राधाकृष्णन, लोकसभा अध्यक्ष ओम बिरला, संसदीय कार्य मंत्री किरण

रिजीजू, राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल, डॉ. एल. मुरुगन आदींचे आभार मानले आहेत.

## दौलावडगाव येथे बंद घराला भीषण आग; लाखो रुपयांचे नुकसान



**बीड** | आष्टी तालुक्यातील दौलावडगाव येथे गोपीनाथ गाडे यांच्या बंद घराला भीषण आग लागली. कुटुंब बाहेरगावी असल्याने जीवितहानी टळली असली तरी घरातील सर्व इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे. आगीच्या ज्वाला शेजारील संजय कोहक यांच्या घरापर्यंत पोहोचल्याने त्यांचेही मोठे नुकसान झाले. अहिल्यानगर अग्निशमन दल, अंभोरा पोलीस आणि ग्रामस्थांनी सामूहिक प्रयत्नांतून आग आटोक्यात आणली. अंभोरा पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून आगीचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## परळी येथे २६ फेब्रुवारीपासून पोलिस पाटीलपदासाठी होणार मुलाखती

**बीड** | परळी वैजनाथ उपविभागांतर्गत रिक्त असलेल्या पोलिस पाटील पदभरती प्रक्रियेतील लेखी परीक्षा नुकतीच पार पडली असून, आता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतींना २६ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. या मुलाखती परळी येथील विशेष अतिथी शासकीय विश्रामगृहात होणार आहेत. २२ फेब्रुवारी रोजी या पदभरतीसाठी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेतून मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी व वेळापत्रक beedpp.recruitonline.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. संबंधित पात्र उमेदवारांना त्यांच्या मुलाखतीचा दिनांक आणि वेळ त्यांच्या लॉगइनवरही कळविली आहे. या मुलाखती छत्रपती शिवाजी महाराज चौकातील विशेष अतिथी शासकीय विश्रामगृहाच्या पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये घेतल्या जातील. पात्र उमेदवारांनी संकेतस्थळावर जाऊन वेळापत्रक तपासावे आणि आवश्यक त्या सर्व मूळ कागदपत्रांसह मुलाखतीला वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन परळीचे उपविभागीय अधिकारी तथा पोलिस पाटील पदभरती प्रक्रिया समिती २०२६ चे अध्यक्ष अरविंद लाटकर यांनी तेले भाटे

## बीडमध्ये १ मार्च रोजी महारक्तदान शिबिर

**बीड** | रोटरी परिवार बीड आणि १६ विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत एक मार्चला बीडमध्ये महारक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचा हा एक पवित्र आणि सामाजिक बांधीलकी जपणारा उपक्रम असून जास्तीत जास्त दात्यांनी या सामाजिक कार्यात सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एक मार्च रोजी सकाळी दहा ते दुपारी अडीच वाजेदरम्यान शहरातील सहयोग नगर येथील स्वामी समर्थ केंद्राच्या बाजूला गुरुनानक दरबार येथे हे शिबिर होणार आहे. या शिबिराचे प्रोजेक्ट चेअरमन अक्षय शेटे सीए आदेश नहार, सचिन लातूरकर हे असतील. सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम असून दात्यांनी यात सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रोटरी क्लब ऑफ बीड, रोटरी क्लबऑफ बीड मिडटाऊन, रोटरी क्लब ऑफ बीड सिटी, माहेश्वरी प्रगती मंडळ, बीड जिल्हा सीए अ‍ॅन्ड टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन, साळीराम अण्णा ढोले पाटील फाउंडेशन, स्वराज्य मुद्रा सामाजिक प्रतिष्ठान, बीड जिल्हा व्यापारी संघटना, गौतम लब्धी फाउंडेशन, योगा दीपमाळ ग्रुप, बीड शहर व्यापारी संघटना, इंडियन मेडिकल असोसिएशन, बीड जिल्हा सिव्हिल कन्सल्टिंग इंजिनिअरिंग असोसिएशन, शेतकरी राजा सामाजिक समिती, महाराष्ट्र वैद्यकीय प्रतिनिधी संघटना यांच्यावतीने या शिबिराचे आयोजन केले आहे.

## स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात सावरकरांना विनम्र अभिवादन



**बीड** | स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या 'आत्मार्पण दिन' निमित्ताने अभिवादन करण्यात आले. प्रमुख वक्ते मा. डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर (उपप्राचार्य, वरिष्ठ महाविद्यालय) यांचे प्रबोधनपर भाषण झाले. त्यांनी सावरकरांच्या जीवनकार्यावर सखोल मांडणी करताना सांगितले की, "सावरकर हे एक अत्यंत ध्येयवादी व्यक्तिमत्व होते, ज्यांच्या रोमरोमात देशाभिमान भिनलेला होता. त्यांनी केवळ क्रांतीचे रणशिंग फुंकले नाही, तर समाजात समरसता आणण्यासाठी जातीभेदाविरुद्ध प्रत्यक्ष कृती केली. सावरकरांनी केवळ शस्त्रच हाती धरले नाही, तर लेखणीच्या माध्यमातून कविता, लावणी, पोवाडा, फटका, महाकाव्य असे सर्व प्रकारचे मराठी साहित्य निर्माण करून मराठी भाषा समृद्ध केली." असे प्रतिपादन केले. त्यानंतर अध्यक्षीय समारोप करताना शालेय समितीचे अध्यक्ष मा. श्री. प्रमोदराव कुलकर्णी यांनी सावरकरांचा त्याग आणि राष्ट्रभक्ती ही आजच्या पिढीसाठी कशी प्रेरणादायी आहे, सावरकरांचे जाज्वल्य विचार सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. असे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली.

# केज तालुक्यातील विविध ठिकाणी शासकीय व विकासात्मक कामांचा सखोल आढावा

तभा. वृत्तसेवा



**बीड** | जिल्हाधिकारी, बीड यांनी केज तालुक्यातील विविध ठिकाणी भेट देऊन शासकीय कार्यालये, औद्योगिक आस्थापना तसेच केंद्र शासन पुरस्कृत विकास योजनांच्या अंमलबजावणीचा प्रत्यक्ष पाहणीद्वारे सखोल आढावा घेतला.

कुंबेफळ (ता. केज) येथे व्यंकटेश्वरा जीनिंग मिलला भेट देऊन कापूस प्रक्रिया, शेतकऱ्यांशी संबंधित बाबी, कामगार व्यवस्थापन तसेच उद्योगातील कार्यपद्धतीची माहिती घेतली. कृषी व औद्योगिक क्षेत्रातील परस्पर समन्वय अधिक सक्षम करण्याबाबत संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

तहसील कार्यालय, केज येथे तहसील कार्यालयातील कर्मचारी, सर्व मंडळ अधिकारी व सर्व ग्राम महसूल अधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत महसूलविषयक प्रकरणांचा वेळेत व गुणवत्तापूर्ण निपटारा करणे, नागरिकांना सुलभ व पारदर्शक सेवा देणे, ई-ऑफीस प्रणालीचा प्रभावी वापर तसेच शासन निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत केज नगरपंचायत क्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या हरित क्षेत्र विकास व तलावाचे सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या अनुषंगाने नगरपंचायत केज येथे आढावा बैठक घेण्यात आली. प्रकल्पांची सद्यस्थिती, कामांची गुणवत्ता, निधी खर्च, तसेच निर्धारित कालमर्यादेत कामे पूर्ण करण्याबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश देण्यात आले.

राजीव गांधी तलाव, केज येथे प्रत्यक्ष भेट देऊन हरित क्षेत्र विकास व तलावाचे सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. पर्यावरण संवर्धन, पाणी साठवण क्षमतेत वाढ, नागरिकांसाठी स्वच्छ व सुरक्षित सार्वजनिक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने कामे नियोजनबद्ध व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

## संदिप क्षीरसागरांनी घेतली महसुल मंत्री यांची भेट

### अप्पर तहसिल कार्यालय तसेच राजुरी-खरवंडी राष्ट्रीय महामार्गाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याची केली मागणी

तभा. वृत्तसेवा



बीड : बीड विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांविषयी आ.संदिप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे महसुल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंह राजे भोसले यांची बुधवारी (दि.२५) रोजी मुंबई येथे भेट घेतली.

बीड विधानसभा मतदारसंघातील चौसाळा येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरू करण्याबाबत राज्याचे महसुल मंत्री ना.चंद्रशेखर बानवकुळे यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी निवेदन दिले. चौसाळा हे गाव शहरापासुन सुमारे ४० कि.मी. अंतरावर आहे. बीड तालुक्याचा मोठा भाग हा चौसाळा परिसराशी जोडलेला आहे. परंतु नागरिकांना महसुल व प्रशासकीय कामांसाठी बीड शहराकडे जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत आहे. या पाश्र्वभुमीवर प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता यावी. लांबच्या गावांना कमी अंतरात शासकीय सेवा मिळावी. शेतकरी, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक व सर्वसामान्यांना दिलासा मिळावा. महसुल विभागाची कार्यक्षमता वाढावी या उद्देशाने चौसाळा येथे अप्पर तहसिल कार्यालय तातडीने सुरू करण्याची मागणी आ.संदिप क्षीरसागर यांनी महसुल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. त्यावर मा.मंत्री महोदयांनी सदरील विषयावर सकारात्मक भुमिका दर्शवत लवकरात लवकर योग्य निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित केले. यासोबतच बीड विधानसभा मतदारसंघातील खरवंडी ते नवगण राजुरी दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चे विस्तारीकरण, मजबुतीकरण तसेच आवश्यक त्या ठिकाणी भुसंपादन करण्याचे काम सन २०१८ मध्ये मंजुर झालेले आहे.

## खा. बजरंग सोनवणे यांची संसदीय मैत्री गटात निवड

तभा. वृत्तसेवा

**बीड** | लोकसभा सचिवालयाच्या वतीने भारत-उझबेकिस्तान संसदीय मैत्री गटाची १८व्या लोकसभेसाठी स्थापना करण्यात आली असून, या गटात बीडचे खासदार बजरंग मनोहर सोनवणे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

लोकसभा सचिवालयाच्या परिषद व प्रोटोकॉल शाखेकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्राद्वारे ही माहिती देण्यात आली आहे. लोकसभेचेअध्यक्ष यांच्या मान्यतेने खासदार बजरंग सोनवणे यांची भारत-उझबेकिस्तान संसदीय मैत्री गटाच्या सदस्यपदी नामनिर्देशित करण्यात आले असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या दोन्ही देशांमधील संसदीय सहकार्य वाढविणे, परस्पर संबंध अधिक दृढ करणे, सांस्कृतिक, आर्थिक व राजनैतिक देवाणघेवाण मजबूत करणे या उद्देशाने संसदीय मैत्री गट कार्यरत असतात. या माध्यमातून दोन्ही देशांतील संसदीय प्रतिनिधींमध्ये संवाद आणि सहकार्य वाढण्यास मदत होणार आहे. या निवडीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थानिक प्रश्न मांडण्याची तसेच देशाच्या परराष्ट्र धोरणाशी संबंधित विषयांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची संधी खा. बजरंग सोनवणे यांना उपलब्ध होणार आहे.

## कै. दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन



तभा. वृत्तसेवा

**अंबड** | दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ वार गुरुवार रोजी सकाळच्या प्रार्थना सभेत स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यानंतर प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक माननीय. श्री. प्रदीप जोशी सर यांनी सावरकर यांच्या विषयी बोलताना म्हणाले की,आज मी आपल्यासमोर भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक पराक्रमी, दूरदर्शी आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्व — स्वातंत्र्यवीर विनायक दामोधर

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांच्यात देशभक्तीची ज्वाला प्रखर होती. त्यांनी तरुण वयातच “अभिनव भारत” या क्रांतिकारी संघटनेची स्थापना करून ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा उभारला.

सावरकरांनी केवळ कृतीतूनच नव्हे तर लेखणीतूनही स्वातंत्र्याची मशाल पेटवली. त्यांनी लिहिलेल्या “१८५७ चे स्वातंत्र्यसमर” या ग्रंथात १८५७ च्या उठावाला “बंड” नव्हे तर “स्वातंत्र्ययुद्ध” असे संबोधून भारतीयांच्या मनात अभिमानाची भावना निर्माण केली.

त्यांच्या क्रांतिकारी कार्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांना अटक करून अंदमानातील सेल्युलर जेलमध्ये जन्मठेपेची शिक्षा सुनावली. त्या काळातील अमानुष छळ, कठोर श्रम आणि एकाकीपणाही त्यांच्या मनोधैर्याला खच्ची करू शकला नाही. तेथेही त्यांनी देशभक्तीची कविता आणि लेखन सुरूच ठेवले.

सावरकर हे प्रभावी वक्ते, कवी, लेखक आणि समाजसुधारक होते. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी प्रयत्न केले आणि समाजात समता व एकता यांचा संदेश दिला. “हिंदुत्व” ही संकल्पना मांडून त्यांनी सांस्कृतिक राष्ट्रवादाचा विचार पुढे आणला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली.

## माजलगाव-तेलगाव बस स्थानकांत महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर

तभा. वृत्तसेवा



**बीड** | माजलगाव येथील सार्वजनिक वाहतुकीत महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद यांच्या वतीने माजलगाव व तेलगाव बस स्थानकांची पाहणी करण्यात आली. या पाहणीत अनेक गंभीर त्रुटी समोर आल्याने संबंधित प्रशासनाला तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात आगार प्रमुख, माजलगाव यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे.

पाहणीदरम्यान बस स्थानक परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याचे आढळून आले. तसेच सुरक्षारक्षक व पोलीस बंदोबस्ताचा अभाव असल्यामुळे महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. बस स्थानकातील पोलीस चौकीची अवस्था अत्यंत दयनीय असून तिचा वापर वॉशरूम म्हणून होत असल्याचेही निदर्शनास आले.महिलांसाठी अत्यावश्यक असलेला ‘हिरकणी कक्ष’ उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. आपत्कालीन परिस्थितीत मदतीची अडचण निर्माण होत असल्याचे परिषदेकडून सांगण्यात आले. याशिवाय महिला हेल्पलाईन क्रमांकाचा फलक नसल्यामुळे महिलांना तातडीने संपर्क साधता येत नाही, अशीही तक्रार करण्यात आली. महिलांसाठीचे स्वच्छतागृह बसथांब्यापासून दूर असून त्याची स्वच्छता समाधानकारक नसल्यामुळे महिला प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तसेच बस स्थानक परिसरात खाजगी वाहनांचे मुक्त पार्किंग होत असल्यामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत असल्याचेही पाहणीत स्पष्ट झाले. या सर्व बाबींचे जीपीएस फोटो पुराव्यासह प्रशासनाला सादर करण्यात आले असून, नवीन बस स्थानकाचे बांधकाम सुरू असले तरी तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात आवश्यक सुविधा व सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रती आमदार तसेच शहर पोलीस स्टेशन, माजलगाव यांनाही देण्यात आल्या असून प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

यावेळी माजलगाव विकास प्रतिष्ठान च्या सचिव नीला देशमुख, डॉ. वरुणराज तौर, अर्चना जाधव, ललिता सोळंके, मीना कदम, सखाराम जोशी, संतोष पालकर उपस्थित होते.

## शिवजयंतीनिमित्त व्याखानाचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**नवगण राजुरी** | छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड येथे शुक्रवारी प्रा. यशवंत गोसावी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड येथे गेल्या नऊ वर्षांपासून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात येतो. यावर्षी शुक्रवार दि.२७/०२/२०२६ रोजी सकाळी ११ वा. श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती प्रेममुर्ती महंत ह.भ.प.शिवाजी महाराज, ह.भ.प.संभाजी महाराज यांच्या आशिर्वादाने व संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या मार्गदशनाखाली आणि राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचे वंशज सिंदखेडराजा येथील शिवाजीराजे जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवव्याखानकार प्रा. यशवंत गोसावी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच रक्तदान शिबीर, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

## स्पर्धा परीक्षेत महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे घवघवीत यश, ४० विद्यार्थ्यांची यशाला गवसणी

तभा. वृत्तसेवा

**परळी** | महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता ८ वर्गाच्या राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक ( एनएमएमएस ) परीक्षेत महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलित चार शाळेतील ४० विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होत घवघवीत यश संपादन केले.

ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी संस्था असलेल्या महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलित महाराष्ट्र विद्यालय मोहा ता-परळी येथील १२, आसुबाई विद्यालय मांडेखेल येथील ९, सांडेश्वर विद्यालय चनई ता-अंबाजोगाई येथील ८ तर गोदावरी विद्यालय मंजरथ ता-माजलगाव येथील ११ असे ४० विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले. महाराष्ट्र शिक्षण संस्था सातत्याने विद्यार्थी गुणवत्तेबाबत प्रयत्नशील राहिलेली असून स्पर्धा परिक्षबाबत जाणीवपूर्वक काम करत असते. राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेतील यश हे या कामाची फलश्रुती होय. या परीक्षेत पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी १२ हजार रुपये असे चार वर्षे ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळत असते. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव व सर्व संचालक मंडळाने चार ही शाळेतील यशस्वी विद्यार्थी, त्याचे मार्गदर्शक शिक्षक व शालेय प्रशासनाचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## आध्यात्मिक मूल्ये आणि सकारात्मक जीवनशैली अत्यंत महत्त्वाची – सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी

### परळी वैजनाथ येथे ब्रह्माकुमारीजच्या वतीने 'स्नेह मिलन' सोहळा

तभा. वृत्तसेवा



**परळी वैजनाथ** | येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने 'स्नेह मिलन' या विशेष आध्यात्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी अध्यक्ष म्हणून उपस्थिती दर्शविली. या प्रसंगी बोलताना नगराध्यक्षांनी राजयोग ध्यान, आध्यात्मिक मूल्ये आणि सकारात्मक जीवनशैली यांचे महत्त्व अधोरेखित केले. समाजात शांतता, नैतिकता आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी अशा प्रकारच्या प्रेरणादायी कार्यक्रमांची आज नितांत गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या म्हणून माऊंट आबू येथील व्यापार आणि उद्योग प्रभाग मुख्यालय-संयोजिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी गीता दीदी जी उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थितांना तणाव व्यवस्थापन आणि व्यक्तिमत्व विकासावर अनमोल मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि स्नेहपूर्ण वातावरणामुळे उपस्थितांना एक नवी आत्मिक ऊर्जा व प्रेरणा लाभली. या कार्यक्रमाला हिंडौन सिटीच्या संचालिका राजयोगिनी ब्र.कु. हेतल दीदी, माऊंट आबू येथील मोटिवेशनल स्पीकर राजयोगी ब्र.कु. राजसिंह भाई, डॉ. अरुण गुट्टे आणि अल्ट्राटेक सिमेंटचे वरिष्ठ सरव्यवस्थापक प्रकाश सिंह हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन पंचवटी नगर येथील ब्रह्माकुमारीज केंद्रात करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय यांच्यावतीने परिश्रम घेतले कार्यक्रमास ब्रह्मकुमारी , नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.